ISO Certified 9001:2008 Getlife Health Care Pvt. Ltd.
विना ऑपरेशनचे पाठ दुखी व गुडघेदुखीवर इलाज
गेटलाईफ हॉस्पिटल
• Trauma Surgeon • Joint Replacement & Surgery
• Orthoscopy • Spine Surgery
डॉ. भूषण जी. सगणे
M.B.B.S., D. Ortho ATLS
Trauma & Joint Replacement Surgeon
MMC Reg. No. 2003/07/2684
विजय कॉलनी, रुख्मिणी नगर, अमरावती: 0721-2571357

पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक २१५ ■ बुधवार, दि. ११ फेब्रुवारी २०२६ ■ मुल्य ३ रुपये ■ पृष्ठे ६
RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642 ■ Postal Regn. No. AKL DN/283/2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com

Dr. Ravi V. Ganeshkar
M.B.B.S., M.S. (ENT)
Fellow Head & Neck Oncosurgery
फेलो हेड अँड नेक ऑंकोसर्जरी
थायरॉइड सर्जरी आणि संबंधित थायरॉइड कॅन्सरचे विशेषज्ञ
मास्टर ऑफ सर्जरी, नाक, कान, गला संबंधित कर्करोग तज्ञ
Mob : 0721-2571357, 9326609901
Address: Gete Life Hospital, Near Maratha Friends,
Vijay Colony, 19 No. School Beside, Rukhmini Nagar, Amravati

# काँग्रेसला सत्ता मिळवता आली नाही, याची लाज वाटली पाहिजे

## संजय राऊत भडकले; हर्षवर्धन सपकाळ यांनी केलेल्या टीकेला प्रत्युत्तर



प्रतिनिधी ११ फेब्रुवारी

**मुंबई/चंद्रपूर :** चंद्रपूर महानगरपालिकेत घडलेल्या एका निर्णयाने राज्याच्या राजकारणात नवा वाद पेटला आहे. शिवसेना ठाकरे गटाने स्थानिक पातळीवर भाजपला पाठिंबा दिल्यानंतर सर्वत्र चर्चेला उधाण आले. कोणत्याही परिस्थितीत भाजपसोबत जाणार नाही, अशी सातत्याने भूमिका मांडणाऱ्या ठाकरे गटाने चंद्रपूरमध्ये घेतलेली भूमिका काँग्रेसच्या टीकेचे कारण ठरली. मात्र, या टीकेला उत्तर देताना शिवसेना खासदार संजय राऊत यांनी थेट काँग्रेसवर हल्ला चढवला. चंद्रपूर महानगरपालिकेत २७ नगरसेवक निवडून आणूनही सत्ता मिळवता आली नाही, याची काँग्रेसला लाज वाटली पाहिजे, असे ते म्हणाले.

राऊत यांच्या मते, काँग्रेसमधील अंतर्गत मतभेदांमुळेच ही परिस्थिती निर्माण झाली. ज्यांनी पाठिंबा द्यायचा होता, त्यांनाही वेगळा निर्णय घ्यावा लागला, असे सांगत त्यांनी शिवसेनेला दोष देण्यात अर्थ नसल्याचे स्पष्ट केले.

त्यांच्या म्हणण्यानुसार, स्थानिक राजकारणातील गुंतागुंत आणि काँग्रेसमधील दोन गटांतील संघर्ष यामुळे सत्ता हातातून गेली. या पार्श्वभूमीवर ठाकरे गटाने घेतलेला निर्णय हा परिस्थितीजन्य होता, असा त्यांचा सूर होता.

दरम्यान, संजय राऊत यांनी हेही स्पष्ट केले की, स्थानिक पदाधिकाऱ्यांना भाजपसोबत कोणत्याही परिस्थितीत जाऊ नका, अशा स्पष्ट सूचना देण्यात आल्या होत्या. मुंबईत गेल्यानंतर या विषयावर सविस्तर चर्चा केली जाईल, असे त्यांनी सांगितले. म्हणजेच, पक्ष पातळीवर या निर्णयाचा आढावा घेतला जाणार असल्याचे संकेत त्यांनी दिले. चंद्रपूरमधील घडामोडी केवळ स्थानिक मर्यादेत राहिलेल्या नसून, त्याचे पडसाद राज्य पातळीवर उमटत असल्याचे चित्र दिसू लागले आहे.

काँग्रेसमधील संघर्षाचा उल्लेख करताना राऊत यांनी प्रतिभा धानोरकर आणि विजय वडेट्टीवार यांच्यातील मतभेदांवर बोट ठेवले. या दोन गटांतील संघर्षामुळेच काँग्रेसला सत्ता गमवावी लागली, असे ते म्हणाले. हा वाद दिल्लीपर्यंत पोहोचला, तरीही दोघांच्या भूमिकेत कोणताही बदल झाला नाही, असा दावा त्यांनी केला. त्यामुळेच पाठिंबा देऊ इच्छिणाऱ्यांनाही वेगळा निर्णय घ्यावा लागला, असे त्यांनी सांगितले. या सगळ्या वादात आणखी एक मुद्दा चर्चेत आला तो म्हणजे सामना वृत्तपत्रातील शांतता. चंद्रपूर महापालिकेत भाजपचा महापौर आणि ठाकरे गटाचा उपमहापौर निवडून आल्याची महत्त्वाची बातमी सामना मध्ये छापली गेली नाही.

### वंचितने केली कारवाई पण नगरसेवक सुटले..

चंद्रपूरच्या महापौर पदासाठी १० फेब्रुवारी झालेल्या निवडणुकीत काँग्रेसचा मित्रपक्ष असलेल्या शिवसेना उबाठाने थेट भाजपसोबत युती केली, तर दुसरीकडे वंचित बहुजन आघाडी आणि एमआयएमने तटस्थ राहून कोणालाही मतदान केले नाही. त्यामुळे काँग्रेसच्या महापौर पदाच्या उमेदवाराचा अवघ्या एका मताने पराभव झाला. त्यामुळे बहुजन वंचित आघाडीने तातडीने कारवाई करत वंचित बहुजन आघाडीचे शहराध्यक्ष स्नेहल रामटेके यांची पदावरून गच्छंती केली आहे.

### चंद्रपुरात घोडेबाजार झाला -काँग्रेस

या सगळ्या घडामोडींवर काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी प्रतिक्रिया देताना सांगितले की, चंद्रपुरात नक्कीच मोठा घोडेबाजार झाला आहे. सुधीर मुनगंटीवार यांचा १००० कोटीचा बंगला हा चर्चेचा विषय आहे. महापौर बनवण्याकरता त्यांनी तेवढेच पत्ते विकत घेतलेले आहेत. यात मोठा घोडेबाजार झालेला आहे. अशा स्थितीत वंचित बहुजन आघाडी आमच्यासोबत असायला हवी होती, हे तेवढेच खरं आहे. चंद्रपूरच्या दोन्ही नेत्यांना आम्ही एकत्रित येण्यासाठी पुढाकार घेतला. आमच्या पक्षात कुठेही फाटाफूट झाली नाही.

# सरकारचे आता NA ला ना !



प्रतिनिधी ११ फेब्रुवारी

**मुंबई:** राज्याच्या जमीन महसूल कायद्यात मोठं बदल करण्यात आलाय. आता बिगर कृषी वापरासाठी जिल्हाधिकाऱ्यांकडून स्वतंत्र परवानगी घेण्याची आवश्यकता संपली असून, एन.ए. (नॉन-अग्रीकल्चरल) परवानगी घेण्याची सुद्धा गरज राहणार नाही. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनंतर महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी जमीन महसूल कायद्यात मोठा बदल केला आहे.

जमीन महसूल कायद्यात मोठे बदल करण्यात आले आहेत. आता अकृषक कर आकारला जाण्याची सोय पूर्णपणे रद्द करण्यात आली आहे. जमीन मालकांना फक्त एकरकमी 'रुपांतरण अधिमूल्य' भरावे लागेल. या रकमेच्या भरपाईनंतर जमीन अकृषक वापरासाठी रूपांतरित केली जाऊ शकते. याशिवाय, सनद घेण्याची गरज देखील संपली आहे. बांधकाम आराखडा मंजुरी मिळाल्यास त्यालाच एन.ए. मानले जाईल. यामुळे जमीन रूपांतर प्रक्रिया जलद, सोपी आणि पारदर्शक होईल.

# प्रलंबित मागण्यांसाठी कचरा घंटा गाड्या आजपासून बंद !





**अकोला:** शहराची कचरा संकलन व्यवस्था नागपूर येथील 'अर्बन एन्व्हायरनमेंट' कंपनीवर अवलंबून आहे आणि घंटा गाड्यांचे चालक याच कंपनीच्या अंतर्गत काम करतात. मात्र, संबंधित कंपनी व्यवस्थापनाकडून कर्मचाऱ्यांचे आर्थिक शोषण केले जात असल्याचा आरोप होत आहे. या अन्यायाविरोधी आज, बुधवारपासून घंटा गाड्या बंद ठेवण्याचा निर्णय घेत चालक संपावर गेले आहेत. यामुळे शहराची कचरा संकलन व्यवस्था पूर्णपणे विस्कळीत झाली आहे.

अकोला महानगरपालिकेत प्रशासक राज संपून लोकप्रतिनिधींचे शासन सुरू झाले आहे, तरीही नागरिकांच्या अडचणी कमी होण्याऐवजी वाढतच आहेत. महापालिका प्रशासन कचरा संकलनासाठी संबंधित कंपनीला दरमहा सुमारे २७ लाख रुपयांचा मोबदला देते. तरीही शहरात अपेक्षित प्रमाणात कचरा संकलन होत नसल्याचे चित्र आहे. संपावर गेलेल्या चालकांनी कंपनीवर आणि प्रशासनावर अनेक गंभीर आरोप केले आहेत. कंपनीने अद्याप चालकांना ओळखपत्र आणि उपचारांसाठी 'हॉस्पिटल कार्ड' दिलेले नाही, ?कर्मचाऱ्यांना वेळेवर मानधन मिळत नाही.

घंटा गाड्यांच्या देखभालीवर दरमहा ३० ते ४० हजार रुपये खर्च होत असताना, कंपनी चालकांकडून ५० हजार रुपयांच्या वसुलीची मागणी करत आहे. गेल्या १२ वर्षांपासून सेवा देऊनही आणि कोरोना काळात जीवाची पर्वा न करता काम करूनही प्रशासनाने त्यांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष केले आहे.

### मागण्या पूर्ण होईपर्यंत संप सुरूच

आपल्या मागण्यांसाठी महापालिका आयुक्त आणि जिल्हाधिकाऱ्यांना वारंवार निवेदने देऊनही कोणताही तोडगा न निघाल्याने चालकांनी आज संपाचे हत्यार उपसले. आंदोलकांनी महापालिकेवर मोर्चा काढत इशारा दिला की, 'जोपर्यंत आमच्या मागण्या पूर्ण होत नाहीत, तोपर्यंत एकही घंटा गाडी रस्त्यावर उतरणार नाही.' शहरात कचरा संकलन न झाल्यामुळे ठिकठिकाणी कचऱ्याचे ढीग साचले आहेत. यामुळे दुर्गंधी पसरून नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण होण्याची भीती व्यक्त होत आहे.

### शहरात दररोज २०० टन कचरा गोळा होतो

शहरात दररोज २५० टन कचरा गोळा करण्याचे उद्दिष्ट असते परंतु २०० टन कचरा गोळा होतो. कचरा संकलित करण्यासाठी १५० घंटा गाड्या आहेत असे मनपा अधिकारी प्रशांत राजूरकर यांनी सांगितले.

# बारावीच्या पहिल्याच पेपरला कॉपीमुक्त परीक्षेला गालबोट !

प्रतिनिधी ११ फेब्रुवारी

**अकोला :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्यावतीने मंगळवार, १० फेब्रुवारीपासून सुरूवात झाली. पहिल्याच इंग्रजी भाषेच्या पेपरला अकोल्यातील गांधीग्रामसह दोन ठिकाणावरील परीक्षा केंद्रावर दोन विद्यार्थ्यांवर कारवाई करण्यात आली. तसेच छत्रपती संभाजीनगर येथे चक्क एकमेकांच्या उत्तरपत्रिका पाहून लिहिणारे व त्या केंद्रावरील शिक्षक अशा १९ जणांवर कारवाई करण्यात आली. त्यामुळे कॉपीमुक्त परीक्षेच्या उद्देशालाच तडा गेल्याचे दिसून आले.

अकोला जिल्ह्यातील गांधीग्राम येथील महात्मा गांधी कनिष्ठ महाविद्यालय परीक्षा केंद्रावर मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. अकोला अनिता मेश्राम यांच्या भरारी पथकाने धाड टाकली असता एक विद्यार्थी कॉपी करताना आढळून आला. त्याच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली. तसेच जिल्ह्यातील आणखी एका परीक्षा केंद्रावर असाच प्रकार आढळून आल्याने त्या विद्यार्थ्यावरही कारवाई करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात सामूहिक कॉपीचा धक्कादायक प्रकार पहिल्याच दिवशी समोर आला. कन्नड तालुक्यातील जैतापूर येथील राष्ट्रीय उच्च माध्यमिक विद्यालय केंद्रावर सामूहिक कॉपीचा सर्व प्रकार 'सीसीटीव्ही'मध्ये कैद झाला. या प्रकरणी शिक्षण विभागाकडून केंद्रसंचालकासह १९ जणांवर गुन्हे दाखल करण्याची प्रक्रिया रात्री उशिरापर्यंत सुरू होती.

### अकोल्यात ९ भरारी पथके कार्यान्वित

कॉपी प्रकाराला आळा घालण्यासाठी विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, विभागीय शिक्षण उपसंचालक, शिक्षणाधिकारी (माध्य.), शिक्षणाधिकारी (प्राथ.), उपशिक्षणाधिकारी (माध्य.), महिला भरारी पथक, उपशिक्षणाधिकारी (प्राथ.), प्राचार्य जिल्हा शैक्षणिक व्यवसाय सातत्यपूर्ण विकास संस्था, अशी ९ भरारी पथके कार्यान्वित करण्यात आली आहेत.

### जिल्ह्यात २२ उपद्रवी केंद्रं!

जिल्ह्यात बारावीच्या परीक्षेत २२ उपद्रवी केंद्रं असून या परीक्षा केंद्रांवर शिक्षण विभाग व भरारी पथकांचे विशेष लक्ष आहे. येथील विद्यार्थी कॉपी करण्यासाठी वेगवेगळया शक्कल लढवत असल्याचे समोर आले आहे. तसेच त्यांनी कॉपीही पुरवल्या जात असल्याचे समजते. त्यामुळे या केंद्रावर करडी नजर ठेवून कॉपी प्रकाराला आळा घालण्याचा प्रयत्न होत आहे.

# राज्याच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाला 23 फेब्रुवारीपासून सुरूवात !

प्रतिनिधी ११ फेब्रुवारी

**मुंबई :** नुकताच केंद्राने देशाचा वार्षिक अर्थसंकल्प सादर केल्यानंतर आता महाराष्ट्र राज्याच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाला २३ फेब्रुवारीपासून सुरूवात होणार आहे. राज्याचा अर्थसंकल्प ६ मार्च रोजी सादर केला जाणार असून, हे अधिवेशन २५ मार्चपर्यंत सुरू राहणार आहे. अजित पवार यांच्या विमान अपघातात झालेल्या अकाली निधानामुळे अर्थसंकल्प राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सादर करतील.

विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे आणि विधानसभा अध्यक्ष अड. राहुल नार्वेकर यांच्या अध्यक्षतेखाली आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत विधानपरिषद व विधानसभा कामकाज सल्लागार समितीची बैठक पार पडली. या बैठकीत अर्थसंकल्पीय अधिवेशनाची रूपरेषा निश्चित करण्यात आली.

त्यानुसार राज्य विधिमंडळाच्या मुंबईत होणाऱ्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाचे कामकाज सोमवार, २३ फेब्रुवारी ते बुधवार, २५ मार्च २०२६ पर्यंत चालणार आहे. ६ मार्च रोजी अर्थसंकल्प मांडण्यात येणार आहे. अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी दोन्ही सभागृहांमध्ये अजित पवार यांच्या निधानाचा शोक प्रस्ताव मांडण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. अधिवेशन काळात शनिवार, २८ फेब्रुवारी रोजी शासकीय सुट्टीच्या दिवशी विधिमंडळाचे कामकाज सुरूच असणार आहे.

# गोवा-मध्यप्रदेश निर्मित 36 लाखांचे मद्य जप्त

प्रतिनिधी ११ फेब्रुवारी



**यवतमाळ :** राज्य उत्पादन शुल्क विभागाने राळेगाव तालुक्यात मध्यरात्री टाकलेल्या धाडीत गोवा व मध्यप्रदेश निर्मित देशी–विदेशी मद्याचा साठा जप्त केला. अंड्यांच्या कागदी कॅरेटच्या बॉक्समध्ये लपवून नेण्यात येणारे एकूण ६८३ बॉक्स मद्य हस्तगत करण्यात आले. यावेळी ५६ लाखांच्या मद्यासह १ कोटी ५ लाख ३५ हजार ६०५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणी तीन अज्ञात आरोपींना फरार घोषित करण्यात आले आहे, अशी माहिती विभागीय उपआयुक्त डॉ. पराग नवलकर (अमरावती) यांनी दिली. डॉ. राजेश देशमुख, आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, तसेच सहआयुक्त प्रसाद सुर्वे यांच्या आदेशानुसार ही कारवाई करण्यात आली. डॉ. नवलकर व गणेश पाटील (नागपूर) यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच संबंधित जिल्ह्यांतील अधीक्षकांच्या समन्वयाने यवतमाळचे निरीक्षक पी.एस. बोढारे यांनी स्थानिक पथक व अमरावती विभागीय भरारी पथकाच्या मदतीने ही धाड टाकली. १० फेब्रुवारी रोजी मध्यरात्री खात्रीलायक माहितीनुसार राळेगाव–अल्लीपूर मार्गावरील कमळेश्वर फाट्यावर सापळा रचण्यात आला. तपासणीदरम्यान अशोक लेलँड कंपनीचा कंटेनर (क्र. एमएच ०४ एच डी ०२९८) अडविण्यात आला. प्राथमिक पाहणीत कंटेनरमध्ये अंड्यांचे कागदी बॉक्स दिसून आले; मात्र ते खाली उतरवून मागील बाजूस तपासणी केली असता गोवा व मध्यप्रदेश निर्मित मद्याचे ६१३ बॉक्स आढळून आले.

# भाजपने ६९ बंडखोरांना सहा वर्षांसाठी केले निलंबित!

प्रतिनिधी ११ फेब्रुवारी

**पुणे :** राज्यात नुकत्याच पार पडलेल्या निवडणुकीमध्ये अनेक घडामोडी घडल्या, अनेक उमेदवारांनी पक्षाने उमेदवारी न दिल्याने अधिकृत उमेदवारांच्या विरोधात आपला अर्ज दाखल केला. अशा पक्षाच्या अधिकृत उमेदवारांविरोधात निवडणूक लढवणाऱ्या ६९ बंडखोरांवर भाजपने कठोर कारवाई करत त्यांना सहा वर्षांसाठी निलंबित केले आहे. प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या आदेशानुसार ही कारवाई करण्यात आली असून, नुकत्याच पार पडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांनंतर हा निर्णय जाहीर करण्यात आला.

# 23 फेब्रुवारी रोजी होणाऱ्या सुनावणीत अकोला जि.प.चा तिढा सुटणार का ?

## जि.प. निवडणूक लढण्यास इच्छुकांचे घडामोडीकडे लक्ष

प्रतिनिधी ११ फेब्रुवारी



**अकोला :** जिल्हा परिषदेत राजकीय आरक्षणाची ५० टक्क्याची मर्यादा ओलांडल्याने निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर होऊ शकला नाही. ओबीसी आरक्षणाच्या मुद्यावरुन सध्या प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. ही सुनावणी २३ फेब्रुवारी होण्याची शक्यता आहे. त्यामुळे सुनावणी झाल्यास निवडणुका जाहीर होणार काय, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

राज्यातील १२ जिल्हा परिषद आणि १२५ पंचायत समित्यांचे निकाल जाहीर झाले. त्यामुळे अकोलासह प्रलंबित जिल्हा परिषदांचा निवडणूक कार्यक्रम कधी जाहीर होतो याची प्रतिक्षा आहे. ५० टक्केवर आरक्षण कळीचा मुद्दा ठरला आहे. अकोला, अकोट, आणि मूर्तिजापूर पंचायत समितीच्या आरक्षणाची टक्केवारी ५० टक्के पेक्षा जास्त आहे. न्यायालयाने ही टक्केवारी ५० पेक्षा कमी हवी, असे यापूर्वीच सांगितले आहे.

पश्चिम विदर्भातील अकोला जिल्हा परिषदेत जानेवारी २०२५, अमरावती जिल्हा परिषदेत २२ मार्च २०२२ पासून, यवतमाळ जिल्हा परिषद आणि बुलडाणा जिल्हा परिषदेत तीन वर्षापासून तर वाशीम जिल्हा परिषदेत एक वर्षापासून प्रशासक राज आहे. तर, पूर्व विदर्भातील नागपूर जिल्हा परिषदेत १८ जानेवारी २०२५ पासून प्रशासक कार्यरत आहे. त्यामुळे २३ फेब्रुवारीला होणाऱ्या सुनावणीकडे या जिल्ह्यातील नागरिकांचे लक्ष लागलेले आहे.

# सोने तस्करी रॅकेटचा पर्दाफाश; 10 कोटींचे सोने जप्त

प्रतिनिधी ११ फेब्रुवारी

**मुंबई :** तस्करीचे सोने वितळवून बाजारात त्याची विक्री करण्यासाठी आलेल्या दोघांना सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) अटक केली आहे. डीआरआयच्या अधिकाऱ्यांनी दोघांकडून १० कोटींच्या सोन्याचा पर्दाफाश केला आहे. मुंबईच्या काळबादेवी परिसरात हे दोघे सोने विक्रीसाठी येणार असल्याची माहिती डीआरआय अधिकाऱ्यांना होती. या माहितीच्या आधारे पोलिसांनी सापळा रचून दोघांना अटक केली आहे. स्वप्निल जाधव आणि श्रेयस साळुंखे अशी या दोघांची नावे आहेत. तपासत दोघांकडे असलेल्या वर्तमानपत्रात एकूण पाच किलो वजनाचे सोन्याचे बार आढळले. या सोन्याची आंतरराष्ट्रीय बाजारातील किंमत १० कोटी रुपये इतकी आहे. अधिकाऱ्यांनी या सोन्यासंदर्भात तुमच्याकडे काही कागदपत्रे आहेत का, अशी विचारणा केली.

नाती जपण्याचा उत्सव
व्हॅलेंटाईन डे विशेष!
'सिटी न्यूज सुपरफास्ट' चा खास उपक्रम
प्रेम कोणाचेही... व्यक्त व्हा कधीही !
प्रेमाला वय नसते आणि शब्दांना सीमा! मग ते प्रेम आई-वडिलांवरचे असो, जोडीदारावरचे असो वा मित्रावरचे ! यंदा तुमच्या आयुष्यातील त्या खास व्यक्तीसाठी दोन ओळी लिहा आणि त्यांच्यासोबतचा फोटो आम्हाला पाठवा.
तुमच्या भावनांना आम्ही देऊ 'सिटी न्यूज सुपरफास्ट'चा हक्काचा मंच!
खास आकर्षक : लकी ड्रॉ
सर्व सहभागींमधून ३ भाग्यवान विजेत्यांना मिळणार आकर्षक बक्षिसे!
सहभाग शुल्क: ₹100/- मात्र
फोटो व संदेश पाठवा: [9075012853]
अंतिम तारीख: 12 फेब्रुवारी 2026
शब्दांची ही भेट ठरेल गिफ्टपेक्षाही अनमोल!
RRC NETWORK
सिटी न्यूज सुपरफास्ट
epaper.citynewssuperfast.com
RRCDIGITALAKOLA rrc_news_akola RRC Digital

सिटी न्यूज अमरावती
बुधवार, दि. ११ फेब्रुवारी २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

# लाडकी बहीण योजनेसाठी आता आधार प्रमाणीकरण

**अमरावती:** मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेंतर्गत पात्र लाभार्थी महिलांची पडताळणी आणि प्रमाणीकरण करण्यासाठी ई-केवायसी माध्यमातून आधार प्रमाणीकरण करण्यास मान्यता देण्यात आली आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेंतर्गत दि. ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत लाभार्थी महिलांनी ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण केली आहे. तथापि, सदर प्रक्रिया पूर्ण करताना लाभार्थ्यांच्या कुटुंबातील सदस्य नियमित, कायम कर्मचारी, कंत्राटी कर्मचारी म्हणून सरकारी विभाग, उपक्रम, मंडळ, भारत सरकार किंवा राज्य सरकारच्या स्थानिक संस्थेमध्ये कार्यरत नसावा किंवा सेवानिवृत्तीनंतर निवृत्तीवेतन घेत आहे किंवा कसे याबाबतचा पर्याय निवडताना नजर चुकीचे पर्याय निवडण्यात आलेला आहे, अशा लाभार्थी महिलांसाठीच ऑनलाईन ई-केवायसीमध्ये पुन्हा एकदा सुधारणा करण्याची संधी दि. ३१ मार्च २०२६ पर्यंत उपलब्ध करून देण्यात आली आहे. असे जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी अतुल भडांगे यांनी कळविले आहे.

# जिल्हा मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमामध्ये राज्यात तिसरा, विदर्भात अव्वल

प्रतिनिधी ११ फेब्रुवारी

## ◆ जिल्हाधिकाऱ्यांकडून बँकांना कडक तंबी



**अमरावती:** मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम अंतर्गत जिल्ह्याने मोठी झेप घेतली असून, कर्ज मंजुरीमध्ये जिल्हा विदर्भात प्रथम तर राज्यात तिसऱ्या क्रमांकावर पोहोचला आहे. दि. १० फेब्रुवारी २०२६ रोजी नियोजन भवन येथे जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या जिल्हास्तरीय समन्वय समितीच्या बैठकीत हा आढावा घेण्यात आला.

उद्दिष्टपूर्तीसाठी जिल्हाधिकारी 'ॲक्शन मोड' मध्ये आले आहेत. आर्थिक वर्ष २०२५-२६ साठी जिल्ह्याला १६०० कर्ज प्रकरणांचे लक्ष्य देण्यात आले आहे. आतापर्यंत जिल्हा प्रशासनाने ३ हजार ७०४ प्रस्ताव बँकांकडे पाठवले असून, त्यापैकी ८०२ प्रकरणांना मंजुरी मिळाली आहे. जिल्ह्याला राज्यात प्रथम क्रमांकावर नेण्यासाठी २५ फेब्रुवारी २०२६ पर्यंत १०० टक्के उद्दिष्ट पूर्ण करण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले आहेत.

सरकारी योजनांच्या कर्ज मंजुरीबाबत खाजगी बँकांकडून दाखवण्यात येणाऱ्या अनास्थेबद्दल जिल्हाधिकाऱ्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. आयसीआयसीआय, ॲक्सिस, एचडीएफसी आणि येस बँक या बँकांच्या अधिकाऱ्यांच्या भूमिकेवर ताशेरे ओढत, जिल्हाधिकाऱ्यांनी त्यांना भर सभेतून निघून जाण्याचे आदेश दिले.

जिल्ह्यातील नवउद्योजक युवक-युवतींच्या व्यवसायाला प्रोत्साहन देण्यासाठी फेब्रुवारी महिन्याच्या अखेरीस अमरावती येथे 'स्वरोजगार महासंमेलन' आयोजित करण्यात येणार आहे. पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली हे संमेलन होईल. यात स्वयंरोजगारातून उत्पादित केलेल्या मालाच्या विक्रीसाठी विशेष स्टॉल्स उभारले जातील. यात नाविन्यपूर्ण उत्पादन करणाऱ्या उद्योगांना प्राधान्य दिले जाईल. बेरोजगार युवक-युवतींनी या योजनांचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

# मोटार सायकल चोरी करणारे ३ सराईत गुन्हेगार ताब्यात

प्रतिनिधी ११ फेब्रुवारी

## ◆ मोटार सायकल चोरीचे ३ गुन्हे उघडकीस



**अमरावती:** पोलीस आयुक्त अमरावती शहर यांनी अमरावती शहरातील मोटार सायकल चोरी चे गुन्हे उघडकिस आणणे बाबत आदेशीत केलेवरून पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण, गुन्हे शाखा अमरावती शहर यांचे नेतृत्वात पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी गुप्त बातमीदार नेमुन खालील प्रमाणे कार्यवाही केली आहे.

पो.स्टे. फेजरपुरा येथील अप क. ४१/२०२६ कलम ३०३ (२) भा. न्या. सं प्रमाणे दाखल असुन सदर गुन्हयाचा समांतर तपास करीत असतांना सदरचा गुन्हा हा साजीद उर्फ शाहरूख पि. मन्सुर खान वय ३० वर्ष रा. रहमत नगर अमरावती याने त्याच्या सहका-या सह केल्याचे तांत्रीक तपासावरून निष्पन्न झाल्याने आज रोजी सदर आरोपी हा कॅम्प परीसरामध्ये असल्याचे गुप्त माहीती मिळाल्याने गुन्हे शाखेच्या पथकाने त्यास ताब्यात घेवुन चौकशी केली असता त्याने त्याचे सहका-यासोबत अमरावती शहरामधे एकुण ०३ मोटार सायकल चोरीचे गुन्हे केल्याची कबुली दिली वरून त्याचे ताब्यातुन मोटार सायकल चोरीच्या गुन्हयातील मुददेमाल जप्त करून खालील गुन्हे उघडकीस आणले आहेत.

ताब्यातील आरोपीतांचे नांव साजीद उर्फ शाहरूख पि. मन्सुर खान वय ३० वर्ष रा रहमतपुरा अमरावती मो. नईम मो कलीम वय २५ वर्ष रा. गवळीपुरा अमरावती, शेख इरफान उर्फ भुरया पि. शेख मन्सुर वय ३० वर्ष रा. सादीया नगर अमरावती आहे.

सदरची कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, अमरावती शहर यांचे मार्गदर्शनाखाली, पोलीस उपायुक्त गणेश शिंदे, पोलीस उपायुक्त श्याम घुगे, पोलीस उपायुक्त मुख्यालय तथा गुन्हे रमेश धुमाळ, रापोआ गुन्हे शाखा शिवाजी बचाटे यांचे मार्गदर्शनात गुन्हे शाखा चे पोलीस निरीक्षक संदिप चव्हाण, पोलीस निरीक्षक सिमा दाताळकर यांच्या नेतृत्वात सपोनि अमोल कडु, पोलीस अंमलदार विकास गुळधे, निखील गेडाम, सागर ठाकरे, योगेश पवार यांनी केली आहे.

# स्व. साहेबराव लेंधे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ आरोग्य शिबिर

प्रतिनिधी ११ फेब्रुवारी

## ◆ १ हजार २०० रुग्णांना मोफत चष्म्यांचे केले वाटप



**अंजनगाव सुर्जी:** स्व. साहेबराव लेंधे यांच्या पावन स्मृतिप्रीत्यर्थ, शालिनी मेघे हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर नागपूरद्वारा आयोजित करण्यात आलेल्या नि शुल्क महाआरोग्य रोगनिदान, रक्तदान शिबिर व मोफत चष्मे वाटप कार्यक्रमाला नागरिकांचा उस्फूर्त प्रतिसाद मिळाला. मंगळवार रोजी आश्रय निवास, स्व. साहेबराव लेंधे यांच्या निवासस्थानी सकाळी ११ वाजतापासून या शिबिराला सुरुवात झाली.

या महाआरोग्य शिबिराचे उद्घाटन प.पू. स्वामी जितेंद्रनाथ महाराज यांच्या शुभहस्ते पार पडले. यावेळी प्रमुख उपस्थिती म्हणून आमदार गजानन लवटे, नगराध्यक्ष अविनाश गायगोले, तहसीलदार पुष्पा सोळंके, उपनगराध्यक्ष प्रियंका मालठाणे, डॉ. वसुधा बोंडे, सविता पुराम, सुधीर खोडे, नितेश वानखडे यांनी उपस्थिती दर्शविली.

या शिबिरासाठी डॉ. मंगेश राऊत, डॉ. कौस्तुभ पाटील, डॉ. मेघा नालाट, डॉ. विलास कविटकर, रामू मालपाणी, रोशन मतकर, भाग्यश्री संतोष लंगोटे, मुन्ना इसोकार, सुयोग खाडे यांनी विशेष योगदान दिले. या महाआरोग्य शिबिरात एकूण १ हजार ८०० नागरिकांनी विविध तपासण्या करून लाभघेतला, यामध्ये १ हजार २०० डोळ्यांच्या रुग्णांना मोफत चष्यांचे वाटप करण्यात आले. तसेच रक्तदान शिबिरात ६० रक्तदात्यांनी स्वेच्छेने रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली. विशेष बाब म्हणजे, शिबिरास आलेल्या प्रत्येक नागरिकासाठी आयोजकांकडून भोजनाची उत्तम व्यवस्था करण्यात आली होती. प्रत्येक लाभार्थी समाधानी होईल, अशी सेवा आणि व्यवस्थापन आयोजकांकडून करण्यात आले. या संपूर्ण उपक्रमाचे उत्कृष्ट नियोजन वैभव लेंधे, मधुरा वैभव लेंधे यांनी केले. शिबिर यशस्वीतेसाठी अक्षय गवळी, शुभांगी पाटणकर, मुन्ना इसोकार, नीतू हाडोळे, केतन श्रीवास्तव, कोकिळा मेन, सुमित लेंधे, अंकित लेंधे आदींनी विशेष परिश्रम घेतले.

# बारावीची परीक्षा 'कॉपीमुक्त' वातावरणात सुरू

प्रतिनिधी ११ फेब्रुवारी

## ◆ जिल्हाधिकाऱ्यांची परीक्षा केंद्राना भेटी ◆ पहिल्याच दिवशी प्रशासनाचा कडक पहारा



**अमरावती:** बारावीच्या परीक्षेला जिल्ह्यात उत्साहात आणि शिस्तबद्ध वातावरणात सुरुवात झाली. जिल्ह्यातील १३७ केंद्रांवर पहिल्या दिवशीचा इंग्रजी विषयाचा पेपर सुरळीत पार पडला. जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी आज पहिल्याच दिवशी परीक्षा केंद्रांना भेटी दिल्या. त्यांच्या मार्गदर्शनाखाली राबवण्यात येत असलेल्या 'कॉपीमुक्त' अभियानामुळे परीक्षा केंद्र परिसरात शांतता दिसून आली. आज एकाही केंद्रावर गैरप्रकार आढळून आला नाही.

कॉपीमुक्त अभियानासाठी प्रशासनाने कडक पावले उचलली असून नियोजन करण्यात आले आहे. परीक्षेतील गैरप्रकार रोखण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी सर्व संस्था प्रमुखांची बैठक घेऊन सूचना दिल्या. त्यानुसार प्रत्येक परीक्षा केंद्रावर पाच सदस्यीय समिती स्थापन करण्यात आली आहे. केंद्रावरील कोणत्याही गैरप्रकारासाठी या समितीला जबाबदार धरले जाणार आहे. परीक्षेच्या पहिल्या दिवशी आज सकाळीच जिल्हाधिकाऱ्यांनी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे संस्था प्रमुखांशी संवाद साधून सतर्क राहण्याच्या सूचना केल्या. प्रशासनातर्फे भरारी व बैठे पथकाची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच जिल्हा प्रशासनाच्या विविध विभागातील वर्ग एक व वर्ग दोनच्या अधिकाऱ्यांची परीक्षा केंद्र भेटीसाठी नियुक्ती करण्यात आली आहे.

आज जिल्हाधिकारी अशिष येरेकर यांनी अमरावतीतील विद्याभारती येथील परीक्षा केंद्राला भेट दिली. जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र यांनी नांदगाव पेठ येथील दोन केंद्राची पाहणी केली. जिल्हा प्रशासनाच्या पुढाकाराने कोणत्याही केंद्रावर बाहेरून असामाजिक तत्वांचा उद्रेक आढळून आला नाही.

जिल्हा प्रशासनाने धारणी आणि चिखलदरा तालुक्यातील केंद्रांवर लक्ष ठेवण्यासाठी आयएफएस अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. आज उपवनसंरक्षक अग्रीम सैनी, निता कट्टे, किर्ती जमदाळे यांनी परिसरातील परीक्षा केंद्रांना भेटी दिल्या. तसेच मेळघाटातील उपविभागीय अधिकारी, तहसिलदार, नायब तहसिलदार यांनी परीक्षा केंद्रांना भेटी दिल्या.

केवळ शिस्तच नव्हे, तर विद्यार्थ्यांच्या सोयीचाही विचार प्रशासनाने केला आहे. परीक्षा कालावधीत विद्युत पुरवठा अखंडित रहावा आणि परिवहन विभागाने विद्यार्थ्यांना केंद्रावर पोहोचण्यासाठी सहकार्य करावे, असे स्पष्ट आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी निर्गमित केले आहेत.

# १४ फेब्रुवारीला गाडगे बाबा समाधी मंदिर येथे महिला भजन सम्मेलन

प्रतिनिधी ११ फेब्रुवारी

**अमरावती:** लाखो भाविक भक्तांचे श्रद्धास्थान असलेले श्री. संत गाडगे महाराज समाधी मंदिर गाडगेबाबा नगर अमरावती येथे श्री. संत गाडगेबाबा जयंती महोत्सवानिमित्त भव्य महिला भजन संमेलन आयोजित केले आहे.

श्री. संत गाडगे बाबा यांचा १५० वा जयंती महोत्सव व महाशिवरात्री उत्सव २०२६ १४ फेब्रुवारी रोजी आयोजित केलेला आहे.

सकाळी दहा वाजता गाडगेबाबांच्या मूर्तीचे मान्यवरांच्या हस्ते पूजन सकाळी ११ ते ५ च्या

### श्री संत गाडगे महाराजांच्या १५० व्या जयंती महोत्सवा निमित्त

दरम्यान श्री. संत गाडगेबाबांच्या १५० व्या जयंती महोत्सवानिमित्त भव्य महिला भजन संमेलन आयोजित केले आहे.

त्याकरता नियम अटी पाहण्याकरता संपर्क भरत महाराज रेडे, ह भ प श्री बोदळे महाराज संस्थेचे व्यवस्थापक प्रकाश महात्मे, यांच्यासोबत संपर्क साधावा दुपारी बारा वाजता अंध अपंग वृद्ध निराश्रीत स्त्री पुरुष यांना अन्नदान ज्ञानेश्वर सौदागरे यांच्या हस्ते तर सायंकाळी साडेसहा वाजता सामुदायिक प्रार्थना १५



फेब्रुवारी सकाळी दहा वाजता पूजन जन्मोत्सव कीर्तन ह भ प बोदडे महाराज अँड संच दुपारी बारा वाजता अंध अपंग निराश्री वृद्ध स्त्री पुरुष फराळ वाटप श्री बोदळे गुरुजी च्या हस्ते सायंकाळी साडेसहा वाजता सामुदायिक प्रार्थना १६ फेब्रुवारी सकाळी दहा वाजता गाडगे बाबाच्या प्रतिमेचे पूजन पुष्पहार अर्पण भजनीकाला ह भ प वैशालीताई पाटील साडेबारा वाजता अंध अपंग निराश्रीत वृद्ध स्त्री पुरुष यांना अजय रामचंद्र जी पुंड अमरावती यांच्यातर्फे पुरणपोळीचे मिष्ठांन भोजन होणार आहे तीन दिवसीय गाडगेबाबा जयंती महोत्सवाचे आयोजन समाधी मंदिर गाडगेबाबा नगर अमरावती येथे आयोजित केले आहे तरी सर्व भाविक भक्तांनी वरील कार्यक्रमाचा उपस्थित राहून लाभ घ्यावा अशी आवाहन संस्थेचे व्यवस्थापक श्री प्रकाश महात्मे यांनी केले आहे.

# नवीन बांधकामाचे ठिकाणावरील इलेक्ट्रिक वायर चोरी करणारे आरोपी ताब्यात

प्रतिनिधी ११ फेब्रुवारी

## ◆ अमरावती शहर गुन्हे शाखे ची कारवाई




**अमरावती :** पोलीस आयुक्त अमरावती शहर यांनी अमरावती शहरातील चोरी चे गुन्हे उघडकिस आणणे बाबत आदेशीत केलेवरून पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण, गुन्हे शाखा अमरावती शहर यांचे नेतृत्वात पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी गुप्त बातमीदार नेमुन खालील प्रमाणे कार्यवाही केली आहे.

१०/०२/२०२६ रोजी पोस्टे राजापेठ, अम. शहर अप क ८१/२०२६ कलम ३०५ (अ), ३२४ (२), भारतीय न्याय संहिता प्रमाणे दाखल गुन्हयाचा समांतर तपास करीत असतांना गुप्त बातमीदाराकडुन माहीती मिळाली की चवरे मार्केट परीसरात दोन इसम हे चोरीचे केबल वायरचे बंडल घेऊन बसलेले आहेत. वरुन आम्ही दोन्ही इसमाना सदर ठिकाणी जावुन ताब्यात घेवुन एकुण ७०,०००/- रूपयाचा मुद्देमाल आरोपीतांकडुन जप्त करून २४ तासाचे आत गुन्हा उघडकिस आणला. ताब्यातील आरोपीतांचे नांव ईश्वर किशोर भोसले, वय २० वर्षे, रा. मोगरा पारधी बेडा, ता. जि. अमरावती व एक विधीसंघर्षीत बालक आहे. ताब्यात घेतलेला मुद्देमाल: . RR KABLE 2.5 sq.mm चे ६ पॅकींग असलेले बंडलें कंपनीचे केबल वायर कि अं ४२,०००रु, खुले पिवळे, निळे व लाल रंगाचे प्लास्टीक पन्नीमध्ये पॅकीग असलेले बंडल केबल वायर कि अं २७,०००रु ३. वायर जाळुन काढलेले तांब्याचे तार कि.अं १,०००रु असा एकुण ७०,०००/- रू चा मुददेमाल जप्त करण्यात आला.

कारवाई . पोलीस आयुक्त राकेश ओला, यांचे मार्गदर्शनाखाली, पोलीस उपायुक्त गणेश शिंदे, पोलीस उपायुक्त श्याम घुगे, पोलीस उपायुक्त मुख्यालय तथा गुन्हे रमेश धुमाळ, सपोआ गुन्हे शाखा शिवाजी बचाटे यांचे मार्गदर्शनात गुन्हे शाखा चे पोलीस निरीक्षक संदिप चव्हाण यांच्या नेतृत्वात पोउपनि गजानन सोनुने, पोलीस अंमलदार पोहेकॉ सुनिल लासुरकर, दिपक सुंदरकर, जहीर शेख, सचिन बहाळे, नापोका अतुल संभे, पोकों सुरज चव्हाण, राजिक रायलीवाले, चालक पोकों प्रभात पोकळे यांनी केली आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट

## खामगाव

# नांदुरा शहरात विक्री साठी आलेला दिड लाखाचा गांजा जप्त !

प्रतिनिधी ११ फेब्रुवारी

## ◆ आरोपीस अटक

**खामगाव :** नांदुरा शहरात गांजा घेऊन येणाऱ्या एका आरोपी च्या ताब्यातुन पोलिसांनी दिड लाखाचा गांजा जप्त केला.

नांदुरा ते जळगांव जामोद रोडवर असलेल्या लक्ष्मी नगर ले आउट मध्ये ९ फेब्रुवारी रोजी दुपारी साडेतीनच्या सुमारास ठाणेदार जयवंत सातव यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शोध पथकाने ही कारवाई केली . या प्रकरणी पोलिसांनी आरोपी शेख अन्वर शेख रशीद वय ६४ रा.बाळापुर फैल खामगाव याच्या विरोधात गुन्हे दाखल करून त्याला अटक केली आहे.

या बाबत प्राप्त माहितीनुसार , आरोपी शेख अन्वर शेख रशीद हा जळगांव जामोद रोडवर असलेल्या लक्ष्मी नगर ले आउट या भागात गांजा घेऊन येणार असल्याची माहिती गुन्हे शोध पथकातील राहुल ससाने यांना मिळाली होती. ही बाब त्यांनी आपले वरीष्ठ ठाणेदार जयवंत सातव यांना सांगितली. ठाणेदार जयवंत सातव यांच्या मार्गदर्शनाखाली पीएसआय नितीन चव्हाण , एएस आय मिलिंद जवंजाळ , ठाणेदार सातव यांचे रायटर कैलास सुरडकर, राहुल ससाने , विनोद भोजने , संदिप डाबेराव, रवि सावळे , सुनील सपकाळ व पंकज डाबेराव यांनी ९ फेब्रुवारी रोजी दुपारी लक्ष्मी नगर ले आउट मध्ये सापळा रचला. दुपारी साडेतीनच्या सुमारास आरोपी या भागात आढळुन येताच पोलिसांनी त्याची झडती घेतली असता त्याच्या जवळ एका पीशवीत २.९९८ किलो ग्रॅम गांजा आढळून आला. पोलिसांनी सदर गांजा किंमत १ लाख ४९ हजार ९०० रुपये पंचासमक्ष जप्त करून आरोपीस अटक केली. या प्रकरणी पोलिस नाईक राहुल ससाने यांनी नांदुरा पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली . त्यांच्या फिर्यादीवरून आरोपी शेख अन्वर शेख रशीद याच्या विरोधात अप. क्रं. ७९ /२०२६ कलम ८ (क), २० (ब), २२ (ब) गुंगीकारक औषधी द्रव्य आणि मानवी मेंदुवर परीणाम करणारे पदार्थ अधिनियम १९८५ (एनडीपिएस / कॅनबीस) अन्वये गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे. या प्रकरणाचा तपास पीएसआय नितीन चव्हाण हे करीत आहेत.

# घरासमोर महिलेला मारहाण; विनयभंगाचा प्रयत्न, दोघांविरुद्ध गुन्हा दाखल

प्रतिनिधी ११ फेब्रुवारी

**खामगाव :** ग्राम काळेगाव (ता. मलकापूर) येथे घरासमोर काम करत असलेल्या महिलेवर शिवीगाळ करत मारहाण करून विनयभंगाचा प्रयत्न केल्याची घटना ९ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ६ वाजताच्या सुमारास घडली. याप्रकरणी नांदुरा पोलीस ठाण्यात दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी सौ. उषा संतोष गुलगे (वय ४०, व्यवसाय शेती, रा. काळेगाव) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, त्या घरासमोर झाडझुड करत असताना आरोपी संजय भगवान घागरे हा तेथे येऊन अश्लील शिवीगाळ करत चापटाबुक्यांनी मारहाण केली. तसेच विनयभंग करण्याच्या उद्देशाने अंगावरील ब्लाऊज फाडल्याने गळ्यातील मंगळसूत्र तुटून पडले. यावेळी संजय घागरे व सौ. गिताबाई संजय घागरे या दोघांनी पुन्हा आमच्या नादी लागल्यास जीव मारण्याची धमकी दिल्याचे फिर्यादीत नमूद आहे. या प्रकरणी अप क्र. ८२/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहितेच्या कलम ७४, ७६, २९६, ११५(२), ३५१(२), ३५१(३), ३(६) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मपोहेकॉ रेखा सरोदे यांनी गुन्हा नोंदविला असून पुढील तपास पोहेकॉ अमोल खोंदील करत आहेत.

# अज्ञात वाहनाची दुचाकीला धडक; वडील ठार मुलगा गंभीर

प्रतिनिधी ११ फेब्रुवारी

खामगाव : अज्ञात वाहनाची दुचाकीला धडक बसून झालेल्या अपघातात दुचाकीस्वार वडीलाचा मृत्यू झाला तर मुलगा गंभीर जखमी झाला. सुखलाल बाबुलाल जाधव वय ४८ रा टाकरखेड असे मृतकाचे नाव असून वैभव वय १३ असे या अपघातातील जखमीचे नाव आहे. ही घटना आज १० फेब्रुवारी रोजी दुपारी साडेचारच्या सुमारास मोताळा रोडवर पुंडलिक महाराज महाविद्यालयाजवळ घडली. या प्रकरणी नांदुरा पोलीसांनी अज्ञात वाहन चालका विरोधात गुन्हे दाखल केले आहेत. या बाबत प्राप्त माहितीनुसार , तालुक्यातील टाकरखेड येथील रहिवासी सुखलाल बाबुलाल जाधव वय ४८ हे मुलगा वैभव वय १३ याच्या सह पलसोडा येथुन आपल्या दुचाकीने ( क्र.एम एच २८ ए व्हि ९९५६ ) नांदुरा मार्गे घरी टाकरखेड येथे जात असताना मोताळा रोडवर शहरा पासुन काही अंतरावर असलेल्या पुंडलीक महाराज महाविद्यालया जवळ त्यांच्या दुचाकीला अज्ञात वाहनाने जोरदार धडक दिल्याने या अपघातात गंभीर जखमी झालेल्या सुखलाल जाधव यांचा मृत्यू झाला तर मुलगा वैभव हा या अपघातात गंभीर जखमी झाला. ही घटना आज दुपारी घडली. अपघात झाल्यानंतर वाहन चालक वाहन घेऊन घटनास्थळावरून पसार झाला. या घटनेनंतर मृतकाचे भाऊ श्यामलाल बाबुलाल जाधव वय ५० रा टाकरखेड यांनी नांदुरा पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली. त्यांच्या फिर्यादीवरून नांदुरा पोलिस ठाण्यात आरोपी अज्ञात वाहन चालका विरोधात अप.क्र.८४/२०२६ कलम १०६ (१), २८१, १२५ (अ) भा. न्या. सं. अन्वये गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे.पुढील तपास हे कॉ दिपक सोळंके हे करीत आहेत.

# अवैध दारू विकणाऱ्या महिले विरोधात कारवाई

प्रतिनिधी ११ फेब्रुवारी

**खामगाव:** नांदुरा शहरातील मोताळा रोडवर असलेल्या रामनगर या भागात अवैध दारू विकणाऱ्या एका महिले विरोधात पोलीसांनी कारवाई करुन तीचे ताब्यातुन ४१० रुपयाचा देशी दारूचा साठा जप्त केला. ९ फेब्रुवारी रोजी सायंकाळी साडेसहाच्या सुमारास हे.कॉ मोहीद्दीन सुलतान सैय्यद यांनी ही कारवाई केली.

शहरातील रामनगर या भागात राहणारी मनिषा प्रेमकुमार काळे वय ३४ हि महिला अवैध देशी दारूचा व्यवसाय करीत असल्याची माहिती हे कॉ.मोहीद्दीन सुलतान सैय्यद यांना मीळाली होती. या माहिती नंतर पोलिसांनी संबंधित ठिकाणी छापा घालून मनिषा काळे हिच्या ताब्यातुन देशी दारूचा ४१० रुपयाचा साठा जप्त केला. या प्रकरणी हे कॉ सैय्यद यांच्या फिर्यादीवरून नांदुरा पोलिस ठाण्यात आरोपी मनिषा प्रेमकुमार काळे हिच्या विरोधात अप क्र ८०/२०२६ कलम ६५ (ई) मदाका अन्वये गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे.

सिटी न्यूज अकोला
बुधवार, दि. ११ फेब्रुवारी २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

# कोळसळा जि.प. शाळेत मूलभूत सुविधांचा अभाव

**मूर्तिजापूर:** तालुक्यातील कोळसळा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत शौचालय व पिण्याच्या पाण्याची गंभीर समस्या निर्माण झाली आहे. शाळेत आवश्यक त्या मूलभूत सुविधा उपलब्ध नसल्यामुळे विद्यार्थ्यांचे मोठ्या प्रमाणात शैक्षणिक नुकसान होत आहे. शाळेत शौचालयाची सोय नसल्याने लहान विद्यार्थ्यांना शाळेच्या वेळेतच शौचालयासाठी घरी जावे लागते, तर पिण्याच्या पाण्याची सुविधा नसल्यामुळे विद्यार्थ्यांना तहान लागल्यावरही शाळेबाहेर जावे लागते. यामुळे विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर परिणाम होत असून शिक्षणात खंड पडत आहे. विशेषतः मुलींच्या शिक्षणावर याचा गंभीर परिणाम होत असून अनेक पालकांनी या परिस्थितीबद्दल नाराजी व्यक्त केली आहे. शासन एकीकडे 'स्वच्छ शाळा, सुरक्षित शाळा'चा नारा देत असताना प्रत्यक्षात मात्र ग्रामीण भागातील शाळांची दयनीय अवस्था आहे, अशी प्रतिक्रिया ग्रामस्थांनी दिली.

## गटई कामगारांना पत्र्याचे स्टॉल; अर्ज मागविले

**अकोला:** समाजकल्याण कार्यालयातर्फे गटई कामगारांना १०० टक्के अनुदान तत्वावर तयार पत्र्याचे स्टॉल देण्याची योजना राबवली जाते. त्यासाठी २८ फेब्रुवारीपूर्वी अर्ज मागविण्यात आले आहेत.

अर्जदार महाराष्ट्राचा रहिवाशी व अनुसूचित जातीचा असावा. कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न ग्रामीण भागातील असल्यास ८० हजार व शहरातील असल्यास १ लाखापेक्षा अधिक असू नये. तहसीलदाराचा उत्पन्नाचा दाखला आवश्यक. वय १८ पेक्षा कमी नसावे. अर्जदार ज्या जागेत स्टॉल मागत असेल ती जागा स्थानिक स्वराज्य संस्थेने त्याला भाड्याने, कराराने, खरेदीने वा विनामूल्य मात्र, अधिकृत ताब्यात दिलेली असावी किंवा त्याच्या स्वयंमालकीची असावी. लाभार्थ्यांचा प्राधान्यक्रम- अॅट्रॉसिटी अॅक्टनुसार पीडित झालेली अनुसूचित जातीची व्यक्ती, घरात कोणीही कमवत नाही अशा विधवा, परितत्त्या महिला, दिव्यांग व्यक्ती असा असेल. इच्छूकांनी सहायक आयुक्त समाजकल्याण, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्यायभवन, पोलीस वसाहतीजवळ, अकोला येथे अर्ज करावेत.

# कामगार कर्मचारी यांच्या प्रलंबित मागण्या संदर्भात मुंबई येथे त्रिपक्षीय बैठक घेणार– आकाश फुंडकर

प्रतिनिधी ११ फेब्रुवारी



**अकोला:** गिरणी कामगार सभा व आयटक कामगार संघटनेच्या माध्यमातून ०९.०२.२०२६ रोजी खामगाव येथे अकोल्याचे पालकमंत्री तसेच महाराष्ट्राचे कामगार मंत्री आकाश फुंडकर यांना कामगार नेते रमेश गायकवाड, विलास पाटील, रमेश अजेडीवाल यांनी बंद पडलेले उद्योग आणि कामगारांच्या प्रश्नाबाबत चर्चा केली. मुंबई येथे त्रिपक्षीय बैठक घेण्यात येईल असे कामगार मंत्री तथा अकोला जिल्ह्याचे पालकमंत्री आकाश फुंडकर म्हणाले.

सन २०१४ पासुन वर्धन सिंटेक्स (बिर्ला कोटि्सन) खामगांव ही कंपनी बंद पडली आहे. गैरकायदेशीर पणे कंपनी बंद पाडुन कामगारांचे अतोनात नुकसान झालेले आहे. कामगार देशोधडीला लागलेले आहे. तसेच अकोला येथील डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला येथे कामगारांना कामावर घेण्याची ठेकेदारी पध्दत ५ वर्षापासुन सुरु झालेली आहे. त्याच प्रमाणे अकोला येथील निळकंठ सहकारी सुतगिरणी, मलकापुर येथील सुतगिरणी गैरकायदेशीर बंद आहे. या बाबत यापुर्वी कामगार मंत्री सोबत अनेक पत्र व्यवहार झालेले आहे. सहाय्यक कामगार आयुक्त मार्फत अनेक वेळा शासनाकडे तक्रारी सुध्दा केलेले आहे. परंतु ठोस कार्यवाही अद्यापही झाली नाही.

बुलढाणा व अकोला जिल्ह्यात कामगारांचे प्रश्न निकाली लागले नाही. सहाय्यक कामगार आयुक्त, सरकारी कामगार अधिकारी व कर्मचारी यांची नेमणुक होत नाही. त्या कारणाने या ठिकाणी कायदेशीर कोणतेही कार्यवाही करण्यात येत नाही. या बाबत ही ठोस निर्णय शासनाकडे प्रलंबीत आहे. विविध मागण्याचे निवेदन देण्यात आले. त्यावर कामगार मंत्री आकाश फुंडकर यांनी मंत्रालयात त्रिपक्षीय बैठक घेण्याचे आदेश संबंधित सचिव यांना दिले असे कॉम्रेड नयन गायकवाड यांनी कळविले आहे.

## नरनाळा महोत्सव चित्ररथाचा शुभारंभ



प्रतिनिधी ११ फेब्रुवारी

**अकोला:** सातपुड्यात वसलेल्या मेळघाटचे वनवैभव, इतिहास व संस्कृतीचे दर्शन घडविणारा नरनाळा महोत्सव दि. १५ ते १७ फेब्रुवारी दरम्यान होणार असून, महोत्सवाबाबत जनजागृतीसाठी चित्ररथाचा शुभारंभ मान्यवरांच्या उपस्थितीत आज झाला. हा चित्ररथ जिल्ह्यात ठिकठिकाणी पोहोचून महोत्सव उपक्रमाची माहिती पोहोचविण्यात येणार आहे. अतिरिक्त जिल्हाधिकारी प्रमोद गायकवाड, निवासी उपजिल्हाधिकारी गजेंद्र मालठाणे, उपजिल्हाधिकारी विजय पाटील, महेश परंडेकर, निखील खेमनार, अधिक्षक श्याम धनमने, ऋषिकेश आग्रे आदी उपस्थित होते. जिल्हाधिकारी वर्षा मीना यांच्या मार्गदर्शनात नरनाळा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असून, जंगल सफारी, साहसी खेळ व विविध सांस्कृतिक कार्यक्रमांच्या समावेश आहे. महोत्सवाच्या प्रत्येक दिवशी सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहेत. 'चला हवा येऊ द्या', 'शिवशंभू गर्जना', तसेच प्रसिद्ध गायक कैलास खेर यांची 'लाईव्ह कॉन्सर्ट' असे नामवंत कलावंतांचा समावेश असलेले कार्यक्रम महोत्सवाचे खास आकर्षण ठरणार आहे.

# श्री रूपनाथ महाराज यात्रा महोत्सवाला आरंभ

प्रतिनिधी ११ फेब्रुवारी



**कुटासा :** दहीहांडा गावाचे ग्रामदैवत श्री रूपनाथ महाराज यांच्या यात्रा महोत्सवाला भक्तिमय वातावरणात सुरुवात झाली. मुख्य मंदिराच्या गाभाऱ्यात विधिवत तीर्थ स्थापना करण्यात आली.

यात्रा महोत्सवात भक्तिसंगीत, गझल, गायन, कविसंमेलन आदी दर्जेदार कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. शनिवारी, ७ फेब्रुवारी रोजी खंजिरी स्पर्धा, तर सोमवार, ९ फेब्रुवारी रोजी प्रवीण आंबुसकर व सहकाऱ्यांची संगीतमय कार्यक्रम झाले.

मंगळवार, १७ फेब्रुवारी रोजी पहाटे श्रीसंत रूपनाथ महाराज यांच्या रथ मिरवणुकीस प्रारंभ होईल. गाव प्रदक्षिणेनंतर दुपारी दहीहांडी कार्यक्रम व सायंकाळी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. भाविकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन श्री रूपनाथ महाराज संस्थानतर्फे करण्यात आले आहे. फेब्रुवारीपासून गणेश महाराज यांच्या मधुर वाणीतून श्री शिवमहापुरा कथेस प्रारंभ झाला. १६ फेब्रुवारीपर्यंत कीर्तन व इतर कार्यक्रम पार पडणार आहेत. सोमवार, १६ फेब्रुवार रोजी शिवमहापुराण कथेची सांगता होईल. यात्रा महोत्सवात भक्तिसंगीत, गझल, गायन, कविसंमेलन आदी दर्जेदार कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. शनिवारी, ७ फेब्रुवारी रोजी खंजिरी स्पर्धा, तर सोमवार, ९ फेब्रुवारी रोजी प्रवीण आंबुसकर व सहकाऱ्यांची संगीतमय कार्यक्रम संपन्न झाले.

मंगळवार, १७ फेब्रुवारी रोजी पहाटे श्रीसंत रूपनाथ महाराज यांच्या रथ मिरवणुकीस प्रारंभ होईल. गाव प्रदक्षिणेनंतर दुपारी दहीहांडी कार्यक्रम व सायंकाळी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. भाविकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन श्री रूपनाथ महाराज संस्थानतर्फे करण्यात आले आहे.

गणेश महाराज यांची शिवमहापुराण कथेस प्रारंभ झाला. १६ फेब्रुवारीपर्यंत कीर्तन व इतर कार्यक्रम पार पडणार आहेत. शिवमहापुराण कथेची सांगता होईल.

# माळवी सुवर्णकार महिला मंडळतर्फे हळदी कुंकू

प्रतिनिधी ११ फेब्रुवारी

◆ ज्येष्ठ व कर्तृत्ववान महिलांचा सत्कार



**अकोला:** माळवी सुवर्णकार महिला मंडळाच्या वतीने मकर संक्रांत प्रित्यर्थ हळदी कुंकू व तिळगुळाचा कार्यक्रमाचे आयोजन केले होते. माळवी सुवर्णकार महिला मंडळाच्या अध्यक्ष डॉ. माधुरीताई सोनी, हॅपी किड्स इंटरनॅशनल स्कूल साईनगर अमरावतीच्या संचालक शिल्पा काळबेंडे प्रमुख पाहुण्या होत्या. शिक्षण सामाजिक क्षेत्रातील योगदानाबद्दल शिल्पाताई काळबेंडे यांना शाल श्रीफळ पुष्पगुच्छ भेटवस्तू देऊन गौरविण्यात आले. ज्येष्ठ महिला अनुसयाबाई पुरुषोत्तम बुळूकले ९२ वर्ष, सिंधुताई विश्वासराव बहाळ वय ७३, समाजातील कर्तृत्ववान महिला धनश्री संतोषराव पिंजरकर व कल्पना विलासराव टकोरे यांचा शाल श्रीफळ पुष्पगुच्छ व भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला. महिलांना हळदी कुंकू तिळगुळ वाण देण्यात आले. महिलांच्या विविध स्पर्धा घेऊन बक्षीस देण्यात आले. कार्यक्रम यशस्वी करणाकरिता मंडळाच्या सर्व पदाधिकारी विशेष कार्यकारिणी सदस्यांचे सहकार्य लाभले.


## निधन वार्ता

### पुष्पाताई मानकर



**अकोला:** गायत्री परिवाराच्या वरिष्ठ साधक श्रीमती पुष्पाताई देवलाल मानकर यांचे १० फेब्रुवारी रोजी निधन झाले. त्या ८१ वर्षांच्या होते. त्यांचे मागे अॅड . किशोर मानकर, डॉ. धनंजय मानकर ही मुले व जिल्हा ग्राहक मंचच्या अध्यक्ष अॅड. वैशाली गावंडे ही मुलगी व मोठा आप्तपरिवार आहे.

### मधुसूदन शिंदे



**अकोला:** मोरेश्वर कॉलनी खेडकर नगरातील रहिवासी मधुसूदन केशवराव शिंदे (८४) यांचे ९ फेब्रुवारी रोजी निधन झाले. ते अखिल भारतीय मराठा महासंघाचे आजीवन सभासद होते. त्यांच्या पश्चात पत्नी ,दोन मुले, एक मुलगी असा आप्त परिवार आहे.

# जिल्ह्यात १८ वाळूघाटांच्या ई-लिलावाला मुदतवाढ

प्रतिनिधी ११ फेब्रुवारी

**अकोला:** जिल्ह्यातील ८ वाळूघाटांच्या ई-लिलावाला दहावी मुदतवाढ देण्यात आली आहे. त्यात अकोला तालुक्यातील कपिलेश्वर, एकलारा, म्हैसांग, उगवा, तसेच बाळापूर तालुक्यातील बहादुरा, सागद, नागद व मांजरी येथील वाळूघाट आहेत.

ई-लिलाव वेळापत्रकामध्ये बदल करण्यात आला असून त्याबाबतचे शुध्दीपत्रक https://mahaters.gov.in व https://www.akola.gov.in या संकेतस्थळावर दि. ९ फेब्रुवारी रोजी प्रसिध्द करण्यात आले आहे.

इतर १० घाटांच्या लिलावालाही मुदतवाढ

त्याचप्रमाणे, जिल्ह्यातील १० वाळूघाटांच्या लिलावाला आठवी मुदतवाढ देण्यात आली आहे. मूर्तिजापूर तालुक्यातील कोळसरा-१, खापरवाडा-२ (खैरी), लोणसणा, बपोरी, पिंगळा दापुरा, बाळापूर तालुक्यातील काजीखेड-२, हिंगणा शिकारी, मोखा, स्वरूपखेड, जानोरीमेळ, तसेच तेल्हारा तालुक्यातील वांगरगाव या ठिकाणांचा समावेश आहे.

या ई-लिलाव प्रक्रियेत दि. १७ फेब्रुवारी रोजी दुपारी १२ वा. पर्यंत ई-निविदा (ई-टेंडर) ऑनलाईन स्वीकारण्यात येतील. दि. १८ फेब्रुवारीस तांत्रिक लिफाफा उघडण्यात येईल. ई-निविदा तांत्रिक पडताळणीनंतर आर्थिक लिफाफा उघडण्यात येईल. दि. २३ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी १० वाजता ते दुपारी १ वाजेपर्यंत ई-ऑक्शन (ई-लिलाव) प्रक्रिया होईल, अशी माहिती जिल्हा खनिकर्म अधिकारी विशाल धांडे यांनी दिली. या लिलावामध्ये जास्तीत जास्त इच्छुक लिलावधारकांनी सहभाग नोंदवावा, असे जिल्हा प्रशासनामार्फत आवाहन करण्यात आले आहे.

# माना बेसिक शाळेत स्नेहसंमेलन व डिजिटल क्लासरूमचे उद्घाटन

प्रतिनिधी ११ फेब्रुवारी



**मूर्तिजापूर :** माना येथील जिल्हा परिषद प्राथमिक डिजिटल शाळा ( बेसिक) येथे स्नेहसंमेलन व डिजिटल क्लासरूमचे उद्घाटन झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच जमील कुरेशी होते. डिजिटल क्लासरूमचे उद्घाटन जि.प. सदस्य तथा माजी सभापती रिजवाना परविन यांच्या हस्ते, तर स्नेहसंमेलनाचे उद्घाटन सरपंच सतीश मोकळकर यांच्या उपस्थितीत झाले.

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमास सुरुवात झाली. मुख्याध्यापक भुषण भडांगे यांनी डिजिटल तंत्रज्ञानाद्वारे अध्यापनाचे प्रात्यक्षिक सादर केले. यानंतर शाळेच्या लोगोचे अनावरण करण्यात आले.

सांस्कृतिक कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी स्वागतगीत, नृत्य, सामाजिक विषयांवरील सादरीकरण, 'माणिकर्णिका' नाटिका व देशभक्तीपर गीत सादर करून उपस्थितांची मने जिंकली.

यावेळी उपसरपंच गजानन गायकवाड, पोलिस पाटील संजय देशमुख, सामाजिक कार्यकर्ते शेख मुख्तार, माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष योगेश मालठाणे, केंद्रप्रमुख विनोद सुसतकर, शाळा व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी, ग्रामपंचायत सदस्य, पत्रकार व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षक सुरेश मुंडे यांनी तर आभार शिक्षिका स्वाती हिरडे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळा व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी, शिक्षक, शिक्षिका, अंगनवाडी सेविका, मदतनीस, पोलीस प्रशासन यांनी परिश्रम घेतले.

# गांधीग्राम पंचक्रोशीत व्यसनमुक्ती संवाद यात्रा

प्रतिनिधी ११ फेब्रुवारी



**अकोला:** महात्मा गांधीजींच्या अस्थि चे विसर्जन १२ फेब्रुवारी १९४८ ला वर्धा जिल्हयातील पवनार येथे व अकोला जिल्ह्यातील गांधीग्राम येथील पूर्णा नदी घाटावर करण्यात आले होते. तेव्हापासून सर्वोदय मंडळ, महात्मा गांधी विद्यालय व पंचक्रोशीतील ग्रामस्थांच्या वतीने १२ फेब्रुवारी ला गांधीग्राम पूर्णा नदी घाटावर गंगापूजन व .सर्वधर्म प्रार्थना सभेचे आयोजन करीत आले आहे. यावर्षी गंगापूजनानंतर महाराष्ट्र नशाबंदी मंडळाचे सौज्यन्याने गांधीग्राम पंचक्रोशीत व्यसनमुक्ती संवाद यात्रा आयोजित करण्यात आली आहे.

ज्येष्ठ सर्वोदयी महादेवराव भुईभार, प्रा.राजाभाऊ देशमुख,सर्वोदय मंडळाचे जिल्हाध्यक्ष बबनराव कानकिरड, भाई प्रदीप देशमुख,महाराष्ट्र सर्वोदय मंडळाचे माजी अध्यक्ष डॉ.शि. ना. ठाकूर, सर्वोदय मंडळाचे जिल्हा सचिव डॉ. मिलिंद निवाने, अनिल मावळे, ह. मो. खटोड,गणेशराव अढाऊ,अरुण साखरकर, प्रा. विवेक हिवरे, कापूस ते कापड अभियानाचे प्रमुख प्रल्हादराव नेमाडे,श्रीकृष्ण विखे पाटील, विठ्ठलराव हिवरे,, प्रा. मोहन खडसे, शंकरराव सरप, साहेबराव तायडे, वासुदेवराव काळमेघ,आत्माराम शेळके, संजय इंगळे,कवी संतोष भाकरे, जय कृष्ण वाकोडे, नितीन भरणे, अनिल वाघमारे,महेश आढे, हिम्मतराव गावंडे, सुरेशचंद्र काळे,डॉ. जगदीश चिंचोळकर, ज्ञानेश्वर मांडेकर, मोहम्मद नदीम, दिलीप साधवाणी,विवेक मेतकर, श्रीकृष्ण माळी,अनिल वाघमारे, कवी तेजराव भिसे, रामराव पाटेखेडे आदि सर्वोदयी, नशाबंदी मंडळाचे कार्यकर्ते पाचमोरी, उगवा, वल्लभनगर, गोपाळखेड, किनखेड, निंभोरा, काटीपाटी, दंहीहांडा या गावातून प्रबोधन करणार आहेत. केळीवेळी येथे संवाद यात्रेचा समारोप होईल. संवाद यात्रेत खादी वस्त्र, निसर्गोपचार साहित्य व व्यसनमुक्ती प्रदर्शनी राहणार आहे.

## ठाणे मॅरेथॉनमध्ये बारा हजार धावपटू सहभागी

प्रतिनिधी ११ फेब्रुवारी



**अकोला:** युनियन बँक ऑफ इंडिया ठाणे हाफ मॅरेथॉनचा १२वा भाग रविवारी ठाणे येथे पार पडला. ज्यामध्ये १२ हजार लोकांनी सहभाग घेत धाव घेतली. या स्पर्धेत २१ किमी, १० किमी आणि ४ किमी (फन रन) अशा तीन गटांमध्ये धावण्यात आले. ४ किमी धावेत लहान मुलांनीही उत्साहाने भाग घेतला.

ठाणे हाफ मॅरेथॉन हा एक प्रमुख क्रीडा मंच म्हणून उदयास आला असून फिटनेसला प्रोत्साहन देतानाच सर्व वयोगटातील लोकांना सक्रिय आणि निरोगी जीवनशैली स्वीकारण्यास प्रेरित करत आहे.

या स्पर्धेचे ब्रँड अॅम्बेसेडर मिलिंद सोमण यांनीही १० किमी धाव पूर्ण केली.

या स्पर्धेबद्दल बोलताना ते म्हणाले, लोकांना फिटनेसबद्दल जागरूक करणे हा माझा उद्देश आहे. त्यामुळे जो कोणी माझ्यासोबत सेल्फी घ्यायची इच्छा व्यक्त करतो, त्याला मी आधी पुश-अप्स करण्यास सांगतो आणि मग सेल्फी घेतो. आजच्या तणावपूर्ण जीवनात आरोग्याबद्दल जागरूकता अत्यंत गरजेची आहे. या स्पर्धेत सहभागी झालेले युनियन बँक ऑफ इंडियाचे एमडी आशीष पांडेय म्हणाले, बँकिंग असो किंवा समाजाचा विकास, युनियन बँक ऑफ इंडिया नेहमीच लोकांच्या मदतीसाठी पुढे असते. आमचा विश्वास आहे की लोक निरोगी असतील तर देश निरोगी राहील, आणि देश विकसित भारत व आत्मनिर्भर भारताच्या दिशेने प्रगती करेल. युनियन बँक ऑफ इंडियाचे एक्झिक्युटिव्ह डायरेक्टर नितेश रंजन म्हणाले, माझ्या मते 'फिट आहे तो हिट आहे'. तुम्ही जितके आरोग्याबद्दल जागरूक राहाल तितके ते तुमच्यासाठी चांगले आहे. संजय रुद्रा यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले, जिंकणे-हरणे यापेक्षा अशा स्पर्धांमध्ये सहभाग घेणे अधिक महत्त्वाचे आहे. आरोग्यासाठी हे अत्यंत आवश्यक आहे. या स्पर्धेच्या प्रमुख पाहुण्या मंदीरा बेदी यांनी उपस्थितांचा उत्साह वाढवला. त्या म्हणाल्या, आनंदाची बाब म्हणजे लहान मुलांनीही यात सहभाग घेतला आहे. लोक आरोग्याबद्दल जागरूक होत आहेत.

स्पर्धेचे पुरुष २१ किमी गट: प्रथम-दाजी हुबळे द्वितीय- विशाल कंबीरे तृतीय-सूरज झोरे **महिला २१ किमी गटात:** प्रथम-अमृता पटेल, द्वितीय-प्राजक्ता गोडबोले, तृतीय-मनीषा जोशी.

## महाशिवरात्री निमित्त श्री क्षेत्र धारगड दर्शनासाठी खुले

वि. प्रतिनिधी ११ फेब्रुवारी



**अकोट :** महाशिवरात्रीनिमित्त रविवारी, दि. १५ फेब्रुवारी २०२६ रोजी श्री क्षेत्र धारगड येथील पुरातन शिवमंदिर शिवभक्तांसाठी दर्शनाकरिता खुले राहणार आहे. या पार्श्वभूमीवर भाविकांनी वन विभागाने दिलेल्या अटी व शर्ती तसेच ठरवून दिलेल्या वेळापत्रकाचे काटेकोर पालन करून शांततेत दर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन श्री क्षेत्र धारगड सेवा समिती, विश्व हिंदू परिषद व बजरंग दल अकोट प्रखंड यांच्या वतीने करण्यात आले आहे.

दर्शनासाठी येणाऱ्या शिवभक्तांसाठी वाहतूक व्यवस्थेचे नियोजन करण्यात आले आहे. चारचाकी वाहनांना धारगड टी पॉईंटपर्यंत जाण्याची परवानगी देण्यात आली असून तेथून श्री क्षेत्र धारगड मंदिरापर्यंत सुमारे एक किलोमीटर अंतर निसर्गरम्य वातावरणात पायदळ चालावे लागणार आहे. दुचाकी वाहनांना खटकाली गेटपर्यंत परवानगी असून, त्यानंतर वन विभागाच्या वतीने प्रतिव्यक्ती २० रुपये दराने वाहन सेवा उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

दर्शनासाठी प्रवेश सकाळी ६ ते दुपारी ३ या वेळेत खटकाली गेटवरून देण्यात येईल. त्यामुळे भाविकांनी वेळेचे नियोजन करून दर्शनासाठी उपस्थित राहावे, असे आयोजकांनी स्पष्ट केले आहे.

शिवभक्तांच्या सोयीसाठी धारगड टी पॉईंट येथे श्री क्षेत्र धारगड सेवा समिती, विश्व हिंदू परिषद व बजरंग दल यांच्या वतीने फराळ व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच परिसर स्वच्छ व सुरक्षित राहावा यासाठी प्लास्टिक पिशव्या, पाण्याच्या बाटल्या, ज्वलनशील पदार्थ तसेच धारधार शस्त्रे नेण्यास मनाई करण्यात आली आहे. वन विभागाने दिलेल्या इतर सर्व अटी व शर्तींचे पालन करून भाविकांनी शिस्तबद्ध व शांततेत दर्शन घ्यावे, असे आवाहन करण्यात आले आहे. महाशिवरात्रीनिमित्त मोठ्या संख्येने शिवभक्त दर्शनासाठी येण्याची शक्यता असून, या पवित्र यात्रेचा लाभ घेताना सर्वांनी सहकार्य करावे, असे आयोजकांनी सांगितले.

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
बुधवार, दि. ११ फेब्रुवारी २०२६
https://epaper.citynewssuperfast.com

# पोलीस भरती : शारीरिक व मैदानी चाचणीला प्रारंभ

## १६१ पदांसाठी १३ हजारांहून अर्ज

प्रतिनिधी ११ फेब्रुवारी

**यवतमाळ :** यवतमाळ जिल्हा पोलीस दलातील सन २०२४-२५ कालावधीतील पोलीस शिपाई संवर्गातील १५० पदे आणि बँड्समन संवर्गातील ११ पदांसाठीची भरती प्रक्रिया बुधवार, दि. ११ फेब्रुवारी २०२६ पासून सुरु झाली आहे. ही भरती प्रक्रिया पळसवाडी पोलीस कवायत मैदान, दक्षता भवनजवळ, दारव्हा रोड, यवतमाळ येथे सकाळी ४ वाजल्यापासून पार पडणार आहे.

पोलीस शिपाई पदासाठी दि. ११ ते २३ फेब्रुवारीदरम्यान शारीरिक चाचण्या घेण्यात येणार असून, बँड्समन पदासाठी दि. २४ व २५ फेब्रुवारी रोजी शारीरिक चाचणी होणार आहे. शिपाई पदासाठी एकूण १२,०९३ ऑनलाईन अर्ज प्राप्त झाले असून त्यापैकी ८,७४४ पुरुष, २,५०० महिला तसेच ८४९ खेळाडू व माजी सैनिक (पुरुष/महिला) उमेदवारांचे अर्ज आहेत. बँड्समनच्या ११ पदांसाठी १,६८७ अर्ज प्राप्त झाले असून त्यात १,००० पुरुष व ६८७ खेळाडू/माजी सैनिक (पुरुष/महिला) उमेदवारांचा समावेश आहे. दि. ११ फेब्रुवारी रोजी पहिल्या दिवशी ७५० उमेदवारांना शारीरिक व मैदानी चाचणीसाठी बोलाविण्यात आले आहे. भरती प्रक्रियेसाठी आवश्यक सर्व प्रशासकीय व सुरक्षा तयारी पूर्ण करण्यात आली असून कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी



६० अधिकारी, ४१० पोलीस अंमलदार व मंत्रालयीन कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत. दि. १० फेब्रुवारी रोजी पोलीस अधीक्षक कुमार चिंते यांनी भरती प्रक्रियेच्या अनुषंगाने शारीरिक व मैदानी चाचणीसाठी नियुक्त पथकांची आणि संपूर्ण बंदोबस्ताची रंगीत तालीम घेऊन स्वतः उपस्थित राहून पारदर्शकतेची खात्री केली. भरती प्रक्रियेत आधुनिक RFID तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येणार असून संपूर्ण प्रक्रिया व्हिडिओ चित्रीकरणाखाली पार पडणार आहे. जिल्हा पोलीस दलातर्फे सर्व उमेदवारांना कोणत्याही भुलथापा किंवा आमिषाला बळी न पडण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## कुत्र्यांच्या हल्ल्यात महिला जखमी

प्रतिनिधी ११ फेब्रुवारी

**यवतमाळ :** शहरातील वडगाव रोड परिसरातील सहकारनगर, महादेवनगर, राणाप्रतापनगर आदी भागात मोकाट कुत्र्यांचा मोठ्या प्रमाणात त्रास वाढला असून नागरिकांच्या सुरक्षेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. या परिसरात दररोज दोन ते तीन नागरिकांना कुत्रे चावत असल्याच्या घटना घडत असून अबालवृद्धांवर सातत्याने हल्ले होत आहेत. त्यामुळे अनेकांना गंभीर दुखापत होत असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

आज गुलशन प्रोव्हिजन दुकानाजवळ तसेच नगराध्यक्षांच्या निवासस्थानाजवळ अंजली चौधरी (निवृत्त शिक्षिका) यांच्यावर मोकाट कुत्र्यांनी अचानक हल्ला करून गंभीर जखमी केले. मोठ्या प्रमाणात रक्तस्राव झाल्याने त्यांना नागरिकांच्या मदतीने तात्काळ रुग्णालयात दाखल करण्यात आले. या घटनेमुळे परिसरात संतापाची लाट उसळली आहे. गेल्या काही दिवसांपासून अशा घटना सातत्याने घडत असून नागरिकांना रस्त्यावरून चालणेही कठीण झाले आहे. विशेषतः लहान मुले, महिला व वृद्ध नागरिकांना मोठा धोका निर्माण झाला आहे. यामुळे परिसरातील नागरिकांनी यवतमाळ नगरपालिकेकडे मोकाट कुत्र्यांचा तात्काळ बंदोबस्त करण्याची मागणी केली आहे. नवनिर्वाचित नगराध्यक्ष प्रियदर्शिनी उईके यांच्या निवासस्थानाजवळच घटना घडल्याने प्रशासनाने तातडीने प्रभावी उपाययोजना कराव्यात, अशी जोरदार मागणी होत आहे.

# चारचाकी वाहनांच्या बॅटऱ्या चोरणाऱ्या टोळीला बेड्या

## चार गुन्हे उघडकीस, स्थानिक गुन्हे शाखेची धडक कारवाई

प्रतिनिधी ११ फेब्रुवारी

**यवतमाळ :** चारचाकी वाहनांच्या बॅटऱ्या चोरी करणाऱ्या टोळीला अटक करून स्थानिक गुन्हे शाखा, यवतमाळ पोलिसांनी २ लाख १५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या कारवाईत यवतमाळ जिल्ह्यातील दारव्हा, यवतमाळ ग्रामीण व अवधुतवाडी पोलीस ठाण्यांच्या हद्दीतील एकूण चार गुन्हे उघडकीस आले आहेत.

शेख रब्बु शेख नवाब (वय २६, रा. डेहणी ता. दिग्रस), परमेश्वर सुनील राठोड (वय २५, रा. सिंधखेड ता. नेर), साहील शंकरराव खवासे (वय २१, रा. अशोकनगर, नेर) अशी आरोपींची नावे आहे.



९ फेब्रुवारी २०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक चोरीच्या गुन्ह्यातील आरोपींचा शोध घेत पेट्रोलिंग करत असताना गोपनीय माहिती मिळाली की, परमेश्वर राठोड व त्याचे साथीदार दारव्हा, यवतमाळ ग्रामीण व अवधुतवाडी परिसरातील वाहनांच्या बॅटऱ्या चोरी करून त्या विक्रीसाठी तीनचाकी अँपे (MH-29-BD-1689) मध्ये भरून यवतमाळ परिसरात फिरत आहेत. मिळालेल्या माहितीनुसार पोबारू ले-आऊट परिसरात सापळा रचून सदर अँपे थांबवण्यात आले. तपासणीदरम्यान वाहनात मोठ्या प्रमाणात बॅटऱ्या आढळून आल्या. चौकशीत आरोपींनी आपली नावे चालक शेख रब्बु शेख नवाब (वय २६, रा. डेहणी ता. दिग्रस), परमेश्वर सुनील राठोड (वय २५, रा. सिंधखेड ता. नेर) आणि साहील शंकरराव खवासे (वय २१, रा. अशोकनगर, नेर) अशी सांगितली. प्रथम उडवाउडवीची उत्तरे दिल्यानंतर पंचासमक्ष चौकशीत आरोपींनी दारव्हा हद्दीतील गिट्टी खदान, ग्राम दहेली तसेच यवतमाळ शहरातील दोन ठिकाणांहून बॅटऱ्या चोरी केल्याची कबुली दिली.

त्यानुसार २० बॅटऱ्या व गुन्ह्यात वापरलेले अँपे वाहन असा एकूण २,१५,००० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. तपासात हा मुद्देमाल दारव्हा पोलीस ठाणे (२ गुन्हे), यवतमाळ ग्रामीण आणि अवधुतवाडी पोलीस ठाण्यांतील गुन्ह्यांशी संबंधित असल्याचे निष्पन्न झाले असून सर्व गुन्हे भा.न्या.सं. कलम ३०३ (२) अंतर्गत नोंद आहेत.

ही कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंते, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात आणि स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सतीश चव्हरे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक पवन राठोड तसेच पोलीस अंमलदार बबलू चव्हाण, मिथुन जाधव, सोहेल मिर्झा, किशोर झेंडेकर, पवन ढवळे, अमित झेंडेकर, जितेंद्र चौधरी व कविश पालेकर यांनी यशस्वीरीत्या पार पाडली.

# ढाणकी शहर चमकणार, कचरा मिटणार!

प्रतिनिधी ११ फेब्रुवारी

**ढाणकी :** शहराच्या स्वच्छतेसाठी नगरपंचायतने युद्धपातळीवर मोहीम हाती घेतली आहे. नगरपंचायत उपाध्यक्ष दत्त दिगंबर वानखेडे यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्य रस्ते, बाजारपेठ आणि सार्वजनिक ठिकाणांवरील साचलेला कचरा मोठ्या प्रमाणावर साफ केला जात आहे. या मोहीमेमुळे नागरिकांना स्वच्छतेच्या महत्त्वाची जाणीव करून देण्याचा प्रयत्नही केला जात आहे.



उपाध्यक्ष वानखेडे म्हणाले, "प्रशासन आपले काम निष्ठेने करत आहे, पण शहर कायमस्वरूपी स्वच्छ ठेवण्यासाठी नागरिकांचा सहभाग अत्यावश्यक आहे. कचरा रस्त्यावर न टाकता, तो घंटागाडीत द्यावा आणि प्रशासनाला सहकार्य करावे."

गेल्या काही दिवसांपासून रस्त्यांवर साचलेला कचरा आता लवकरच पूर्णतः साफ होणार आहे. प्रशासनाचे ध्येय फक्त स्वच्छता नाही, तर नागरिकांचे आरोग्य आणि शहराची सुंदरता टिकवणे देखील आहे. नागरिकांचे सहकार्य मिळाल्यास शहर खरोखरच 'स्वच्छ आणि सुंदर' बनणार आहे.

# पेसा ग्रामसभेच्या ठरावाला नाकारुन भुसुरुंग स्फोटाची परवानगी

## निम्न पैनगंगा प्रकल्पावर शेतकऱ्यांचा संताप

प्रतिनिधी ११ फेब्रुवारी

**आर्णी :** पेसा अंतर्गत येणाऱ्या खडका ग्रामपंचायतीच्या ग्रामसभेने दिनांक २६ डिसेंबर २०२५ रोजी निम्न पैनगंगा प्रकल्पाच्या माती धरण, सांडव्याचे खोदकाम व भुसुरूंग स्फोटाला मुदतवाढ न देण्याचा ठराव सर्वानुमते पारित केला होता. तरीही यवतमाळ जिल्हाधिकारी यांनी दिनांक ६ जानेवारी २०२६ रोजी पाटबंधारे विभाग आणि कंत्राटदाराला स्वतःच्या अधिकारात खडका हद्दीत भुसुरुंग स्फोट करण्याची परवानगी दिली असून ती ३१ डिसेंबर २०२६ पर्यंत वैद्य असल्याचे नमूद केले आहे.

या निर्णयामुळे पेसा ग्रामपंचायतीचे संविधानाने मिळालेले अधिकार तसेच भूसंपादन कायदा २०१३ अंतर्गत अनुसूचित क्षेत्रातील जमीन सुरक्षित ठेवण्याचे अधिकार ठेकेदार व अधिकारी उडवून मारल्याची टीका स्थानिक शेतकऱ्यांनी केली आहे. पाटबंधारे विभागाचे अधिकारी आणि कंत्राटदार या भागात रात्रंदिवस भुसुरुंग स्फोट, खोदकाम व माती धरणाचे काम जोरदारपणे सुरू असल्याने आदिवासी भागात लोकशाही वा ठोकशाही या प्रश्नावरून संताप पसरला आहे.

याबाबत आज निम्न पैनगंगा धरण विरोधी संघर्ष समितीच्या पदाधिकाऱ्यांनी





जिल्हाधिकारी यांची प्रत्यक्ष भेट घेऊन निवेदन दिले. संघर्ष समितीचे अध्यक्ष प्रल्हादराव पाटील जगताप, प्रसिद्धी प्रमुख व संघटक सचिव मुबारक तंवर, सचिव विजय पाटील राऊत, कोषाध्यक्ष प्रल्हादराव गावंडे सर, तसेच रवी ठाकरे, विलास भेंडे, अविनाश जगताप, शंकर संगमवार यांसह अनेक शेतकरी उपस्थित होते. पदाधिकाऱ्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना स्पष्ट सांगितले की, ग्रामसभेच्या ठरावाला नाकारून परवानगी देण्याचा अधिकार असल्यास तो लेखी स्वरूपात द्यावा, अन्यथा पेसा ग्रामपंचायतीचे सर्व अधिकार कायम ठेवावे. जिल्हाधिकाऱ्यांनी पाटबंधारे विभागासोबत लवकरच धरण विरोधी संघर्ष समितीची बैठक घेऊन चर्चेसाठी वचन दिले.

# भरधाव स्कॉर्पिओने दुचाकीस्वाराला चिरडले

## आर्णी नाका बनतोय मृत्यूचा सापळा!

प्रतिनिधी ११ फेब्रुवारी

**यवतमाळ :** आर्णी नाका परिसरात आज सकाळी साडे सात वाजता घडलेल्या भीषण अपघाताने नागरिकांची चिंता वाढवली आहे. भरधाव स्कॉर्पिओ वाहनाने दुचाकीला चिरडल्याने दुचाकी चालक गंभीर जखमी झाला. ही घटना अपवाद नाही; अवघ्या दोन दिवसांपूर्वी याच ठिकाणी अशाच प्रकारचा अपघात झाला होता.

आर्णी नाका हा परिसर दिवसरात्र प्रचंड वर्दळीचा असून येथे दुचाकी, चारचाकी, ट्रॅव्हल्स, खासगी व शासकीय वाहने भरधाव वेगाने धावत असतात. मात्र, स्पीड ब्रेकर नाही, ट्रॅफिक सिग्नल नाही, वाहतूक नियंत्रणही नाही. स्थानिकांनी प्रशासनाकडे अनेकदा तोंडी, लेखी तक्रारी केल्या, तरी प्रशासनाचे दुर्लक्ष होत आहे. नागरिकांचा आरोप आहे की, प्रशासनाची निष्क्रियता आर्णी नाका परिसराला अपघातांचा हॉटस्पॉट बनवत आहे. तात्काळ स्पीड ब्रेकर बसवावे, ट्रॅफिक सिग्नल कार्यान्वित करावे, वाहतूक पोलिसांची कायमस्वरूपी नेमणूक करावी. "वेळीच ठोस उपाय न झाल्यास भविष्यात होणाऱ्या अपघातांची जबाबदारी संपूर्णपणे प्रशासनावर राहील." या घटनेनंतर प्रश्न उपस्थित होतो की, प्रशासन अपघातानंतरच जागे होणार आहे की कोणाचा मृत्यू होण्याआधी उपाययोजना करेल? आर्णी नाका परिसरातील रहिवासी आता आपल्या जीवित सुरक्षेसाठी तातडीने निर्णय घेण्याचा दबाव निर्माण करत आहेत.

# महिलांनी संघर्षशिल रमाईचा आदर्श घ्यावा : नगरसेविका कविता काळबांडे

प्रतिनिधी ११ फेब्रुवारी

**उमरखेड :** संकटाच्या काळात बाबासाहेबांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहून आपल्या पतीला समर्थपणे साथ देणाऱ्या संघर्षशिल रमाई यांच्या आदर्शाला महिलांनी अनुसरावे, असे आवाहन नगरसेविका कविता राहूल काळबांडे यांनी केले. त्या आपल्या प्रभागात आयोजित माता रमाई जयंती सोहळ्यात बोलत होत्या.

जयंती सोहळ्याचे अध्यक्षस्थानी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले महिला मंडळाच्या अध्यक्षा केशरबाई पाईकराव होत्या. कार्यक्रमाची सुरुवात महिला मंडळाच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करून, उपस्थितांना त्रिशरणासह पंचशील प्रदान करून झाली. त्यानंतर मंडळाच्या सदस्यांनी रमाईवरील गीते गायली आणि जयंती सोहळा उत्साहात साजरा झाला.



उद्बोधनात काळबांडे यांनी सांगितले की, "संसारात काटकसर, बचत आणि आलेल्या प्रसंगाला समर्थपणे पेलणारी रमाई बाबासाहेबांच्या सावलीसारखी होत्या. बाबासाहेब 'दिवा होते तर त्या दिव्याची वात' होण्याचे सामर्थ्य त्यांनी दाखवले. तिचा आदर्श आमच्या सारख्या महिलांसाठी प्रेरणादायी आहे." या जयंती सोहळ्यात मायाबाई हापसे, रंजनाबाई आळणे, निर्मला रोकडे, संगिता बडेराव, सिंधुबाई खंदारे, पृष्पा कोकणे, दीक्षा गंगावणे, सोनु हरणे, जयश्री ढोबळे, पंचशीला बडेराव, छाया लोणकर, मंदा काळबांडे, लक्ष्मीबाई राऊत, निलाबाई पाटील, सुलोचना अढागळे, वर्षा आगासे, बेबाबाई राउत, कोमल घोंगडे, शोभाबाई जोगदंड, शंकूतला चौरे, लक्ष्मीबाई बरडे यांनी सहभाग घेतला. कार्यक्रमाच्या शेवटी राहूल काळबांडे, उत्तमराव शिंगणकर, संतोष निथळे आणि इंजि. पंकज गायकवाड यांनी उपस्थितांना खिरदान वाटून सोहळा सांगता केला.

या कार्यक्रमाद्वारे महिलांमध्ये संघर्षशीलता आणि समाजकार्यात सहभागी होण्याची प्रेरणा वाढविण्याचा प्रयत्न करण्यात आला.

## जागेच्या वादातून कळंबमध्ये हाणामारी

प्रतिनिधी ११ फेब्रुवारी

**कळंब :** तालुक्यातील हलबीपुरा परिसरात जागेच्या जुन्या वादातून झालेल्या हाणामारी प्रकरणी पोलिसांनी एका आरोपीसह तीन अनोळखी व्यक्तींविरोधात गुन्हा दाखल केला आहे. फिर्यादी मंगेश विठ्ठल अगडे (वय ४५, रा. हलबीपुरा, प्रभाग क्र. १३) व आरोपी गणेश पंढरी वाल्दे (वय ४२) हे शेजारी राहत असून, दोघांमध्ये जागेवरून दीर्घकाळ वाद सुरू होता. ८ फेब्रुवारी २०२६ रोजी सायंकाळी साडेसहा वाजताच्या सुमारास ग्राम गलमगाव येथील 'समीक्षा बार'जवळ आरोपी गणेश वाल्दे व त्याच्यासोबत असलेल्या तीन अनोळखी साथीदारांनी संगनमत करून मंगेश अगडे यांच्याशी वाद घातला. वाद वाढताच फायबरच्या पाईपने मारहाण करून त्यांना जखमी करण्यात आले. शिवीगाळ करत ढाब्यातील साहित्याचेही नुकसान करण्यात आले.

# जिल्हास्तरीय योगासन स्पर्धेत उत्कर्ष राजुरकर प्रथम

प्रतिनिधी ११ फेब्रुवारी

**आर्णी :** जवळा येथील जि. प. प्राथमिक मराठी शाळा, जवळा (मुले) येथील इयत्ता ५ वी चा विद्यार्थी उत्कर्ष रविंद्र राजुरकर यांनी जिल्हास्तरीय खेळ, क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धा–२०२६ मध्ये "योगासने" या क्रीडा प्रकारात ६ ते ११ वयोगट (मुले) मध्ये प्रथम क्रमांक पटकावला. ही स्पर्धा खेळ, क्रीडा व कला संवर्धक मंडळ, जिल्हा परिषद यवतमाळ यांच्या आयोजनाखाली दिनांक ५ फेब्रुवारी २०२६ रोजी नेहरू स्टेडियम, यवतमाळ येथे उत्साहात पार पडली.



उत्कर्ष राजुरकर याच्या या यशामागे शाळेच्या मुख्याध्यापिका नीता देशमुख यांचे मार्गदर्शन, सातत्यपूर्ण प्रयत्न आणि शाळेतील क्रीडा संस्कृतीचा मोठा वाटा असल्याचे सांगण्यात येत आहे. यशाबद्दल शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष बलेश कार्लेकर, मार्गदर्शक शिक्षक श्रीलंकेश्वर भगत, मुख्याध्यापिका नीता देशमुख, संपूर्ण शिक्षकवृंद यांनी उत्कर्षाचे अभिनंदन केले. स्पर्धेत मिळालेल्या या यशामुळे फक्त उत्कर्षच नाही, तर संपूर्ण शाळेचा आणि गावाचा गौरव वाढला असून स्थानिक समाजामध्ये शाळेची प्रतिष्ठा अधिक दृढ झाली आहे. याव्यतिरिक्त, या यशामुळे शाळेतील इतर विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, क्रीडा आवड आणि स्पर्धात्मक वृत्ती वाढण्यास मोठा हातभार लागला आहे. उत्कर्षचे कौशल्य, चिकाटी आणि शाळेच्या प्रोत्साहनामुळे जिल्हास्तरीय स्पर्धेत पहिल्या क्रमांकावर पोहोचणे हे आदर्श ठरले असून, स्थानिक शिक्षक, पालक, समाजस्तरातून त्याला शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# पोलिसांच्या समक्ष शेतकऱ्यांचा विष घेण्याचा प्रयत्न

## शक्तिपीठ महामार्ग : दुसऱ्या दिवशी शेतकऱ्यांचा जनआक्रोश

प्रतिनिधी ११ फेब्रुवारी

**उमरखेड :** शक्तिपीठ महामार्गासाठी मोजणी करण्यासाठी आलेल्या अधिकाऱ्यांचा उमरखेड तालुक्यातील शेतकऱ्यांनी सलग दुसऱ्या दिवशीही विरोध केला. मोजणीसाठी करोडी आमला शिवारात गेलेल्या टीमला शेतकऱ्यांनी अडवले, त्यानंतर पोलिसांना प्राचारण करावे लागले. पोलिसांच्या उपस्थितीतही एका शेतकऱ्याने विषारी औषध घेण्याचा प्रयत्न केला, तर इतर शेतकऱ्यांनी आत्महत्या करण्याचा इशारा देऊन संघर्षाची तीव्रता वाढवली.

स्थानिक शेतकऱ्यांनी "कोणत्याही परिस्थितीत आमच्या जमिनीत शक्तिपीठात मोजणी होऊ देणार नाही" अशी ठाम भूमिका घेतली. प्रभारी ठाणेदार गोपींवार



आणि पीएसआय सागर इंगळे यांनी शेतकऱ्यांना समजावण्याचा प्रयत्न केला, परंतु ते आपल्या मागण्यावर ठाम राहिले.

पोलिसांच्या संरक्षणाखाली मोजणी सुरू करण्यात आली असतानाही शेतकऱ्यांनी घोषणाबाजी करत ती थांबवण्याचा प्रयत्न केला. तणाव वाढल्याने पोलिसांनी आक्रमक झालेल्या शेतकऱ्यांना ताब्यात घेऊन उपविभागीय अधिकारी सखाराम मुळे यांच्या दालनात आणले.

या बैठकीत जि. प. सदस्य चित्तांगराव कदम यांनी शेतकऱ्यांची भूमिका मांडली. शेतकऱ्यांनी सांगितले की, "आमच्या सुपीक जमिनीच्या भावाच्या आहेत, तुटकुंची मदत शासनाकडून मिळते, तरीही आम्ही आमच्या जमिनीवर कोणत्याही परिस्थितीत मोजणी होऊ देणार नाही," असे पवित्रा घेतला. आतापर्यंत झालेल्या घटनांमुळे उमरखेड तालुक्यात शेतकरी आणि प्रशासन यांच्यातील संघर्षाची चिन्हे स्पष्टपणे दिसून येत आहेत.

स्थानिक प्रशासनाने शेतकऱ्यांना समजावून शांतता राखण्याचा प्रयत्न सुरू ठेवला असून, येणाऱ्या काळातही या वादाचे स्वरूप गांभीर्याचे राहण्याची शक्यता आहे.

## अज्ञात वाहनाने चिरडला मेंढ्यांचा कळप

प्रतिनिधी ११ फेब्रुवारी

**राळेगाव :** राळेगाव ते वडकी हायवे रोडवर भरधाव वेगाने जाणाऱ्या अज्ञात वाहनाने मेंढ्यांच्या कळपाला जोराची धडक दिल्याने भीषण अपघात घडला. या घटनेत सात मेंढ्यांचा जागीच मृत्यू झाला असून मेंढपाळाचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. बाळू घुले (रा. बोरजई, ता. कळंब) हे ९ फेब्रुवारी रोजी आपला मेंढ्यांचा कळप घेऊन जात असताना प्रकाश भोयर यांच्या शेताजवळ रस्ता ओलांडत होते.

यावेळी अज्ञात वाहन चालकाने निष्काळजीपणे वाहन चालवून कळपाला धडक दिली. यात सुमारे ७९ हजार रुपयांचे नुकसान झाले. याप्रकरणी राळेगाव पोलिसांनी अज्ञात चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

# अवैध वाळू वाहतुकीवर कारवाई; टिप्पर जप्त

प्रतिनिधी ११ फेब्रुवारी

**वणी :** तालुक्यात सुरू असलेल्या अवैध वाळू वाहतुकीविरोधात मारेगाव पोलिसांनी धडक कारवाई करत कुंभा–करनवाडी मार्गावर साखरा गावाजवळून विना परवाना वाळू वाहतूक करणारा टिप्पर पकडला. या कारवाईत पोलिसांनी 6 लाख 20 हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करून दोन आरोपींविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

10 फेब्रुवारी 2026 रोजी मारेगाव पोलिस स्टेशनचे एएसआय दिंगाबर किनाके हे पोकॉ. शुभम उईके यांच्यासह शासकीय वाहनातून बिट परिसरात पेट्रोलिंग करीत असताना त्यांना पहाटे 3.30 ते 4.00 वाजताच्या सुमारास कुंभा ते करनवाडी मार्गाने MH-29-T-1533 क्रमांकाचा पांढऱ्या-हिरव्या रंगाचा टिप्पर



संशयास्पदरीत्या येताना आढळला. पोलिसांनी करनवाडी फाट्याजवळ टिप्पर थांबवून पंचासमक्ष टिप्परची तपासणी केली असता, त्यामध्ये 4 ब्रास वाळू (रेती) आढळून आली. चालकाकडे रेती वाहतुकीचा परवाना मागितला असता तो उडवाउडवीची उत्तरे देऊ लागला. त्यामुळे टिप्परमधून विना परवाना रेतीची चोरटी वाहतूक केली जात असल्याचे उघड झाले. पोलिसांनी वाळू भरलेला टिप्पर जप्त करून पोलिस स्टेशनला लावला.

पोलिसांनी या धडक कारवाईत ४ ब्रास वाळू किंमत २० हजार रुपये व टिप्पर किंमत ६ लाख रुपये असा एकूण ६ लाख २० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

या प्रकरणी एएसआय दिंगाबर किनाके यांच्या लेखी तक्रारीवरून वाळूची विनापरवाना वाहतूक करणाऱ्या ज्ञानेश्वर गणपतराव ठाकरे रा. कळंब व सचिन दरने रा. हिवरा, ता. कळंब यांच्याविरोधात बीएनएसच्या कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कार्यवाही ठाणेदार श्याम वानखेडे यांच्या मार्गदर्शनात एएसआय दिगांबर किनाके व पोकॉ शुभम उईके यांनी केली.

घटनेचा पुढील तपास एएसआय दिगांबर किनाके व पोलिस शिपाई सागर दिपेवार पोलीस करत आहेत. अवैध वाळू वाहतुकीमुळे महसुलाचे मोठे नुकसान होत असून, पोलिसांची ही कारवाई रेती चोरीला चाप लावणारी व महसूल विभागाचे डोळे उघडणारी ठरली आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम

बुधवार दि. ११ फेब्रुवारी २०२६ http://epaper.citynewssuperfast.com



कृषिमंत्र्यांच्या 'पालक' जिल्ह्यात शेतकऱ्याचा 'छळ', त्यांना कोणाचे 'बळ'...




## 'देवा' अजब तुझा न्याय, न्याय मागणाऱ्यावर अन्याय...

# लोकशाही नव्हे, अधिकारशाही !

## अधिकाऱ्यांकडून शेतकऱ्याला बुटाने मारहाण, आत्महत्या करण्याचा सल्ला, तक्रार कर्त्याला धमक्या

●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

आकांक्षीत जिल्हा म्हणून वाशीम जिल्ह्याची नोंद आहे. जिल्ह्यात मोठे प्रकल्प नाहीत ज्याचे जीवनमान शेतीवरच अवलंबून आहे. मात्र, शासकीय योजना खऱ्या शेतकऱ्यापर्यंत पोहोचत नाहीत. न्याय माघणाऱ्या शेतकऱ्यावरच अधिकाऱ्यांकडून अन्याय होत आहे. मंगरूळपीर तालुक्यातील गोगरी येथील शेतकऱ्याला कृषी अधिकाऱ्याने बुटाने मारहाण केली.शेलुखडसे येथील पोकराची तक्रार करणाऱ्या शेतकऱ्याला जीवे मारण्याची धमकी कृषी अधिकाऱ्याने दिली. तर आता वहीवाटीचा रस्ता माघणाऱ्या शेतकऱ्याला नायब तहसीलदारानी चक्क आत्महत्याकरण्याचा सल्ला दिला. यावरून जिल्ह्यात लोकशाही नसून अधिकारी शाही सुरू आहे. त्यामुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणविस साहेब 'देवा' अजब तुझा न्याय, न्याय माघणाऱ्या शेतकऱ्यावरच होतोय अन्याय अशी म्हणण्याची वेळ शेतकऱ्यांवर आली आहे. कृषी मंत्र्याच्या पालक जिल्ह्यातच अधिकाऱ्याकडून छळ होत असून त्यांना कोणाचे बळ मिळत आहे अशी चर्चाही होत आहे.





रिसोड तालुक्यातील केनवड येथे वहिवटीच्या रस्त्यासाठी हक्क मागणाऱ्या शेतकऱ्याला नायब तहसीलदाराकडून आत्महत्या करण्याचा सल्ला दिल्याचा गंभीर आरोप समोर आला आहे. या संपूर्ण प्रकाराचे व्हिडिओ सध्या सोशल मीडियावरील विविध व्हॉट्सअॅप ग्रुपवर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहेत. परिणामी शेतकऱ्यांसोबत नेहमीच उद्धट भाषा वापरणारे नायब तहसीलदार कुळमेठे पुन्हा एकदा वादाच्या भोवऱ्यात अडकले आहेत. या गंभीर बाबीकडे तहसीलदा प्रतीक्षा तेजनकर यांनी विशेष लक्ष घालावे अशी अपेक्षा तालुक्यातील शेतकरी व्यक्त करीत आहेत.

केनवड येथील शेतकरी गुलाब लक्ष्मण दांडगे यांचा वहिवटीचा रस्ता सुमारे ९ ते १० महिन्यांपासून अडविण्यात आला असून, त्यामुळे शेतातील तूर, हरभरा व गहू घरी आणता येत नसल्याची तक्रार शेतकऱ्यांकडून करण्यात आली आहे. सदर प्रकरण मामलेदार कार्यालयात प्रलंबित असून, गेल्या अनेक महिन्यांपासून केवळ तारखांवर तारखा दिल्या जात असल्याचे सांगण्यात आले.मा. तहसीलदारांच्या सूचनेनुसार स्थळ पाहणीसाठी सबंधित अधिकारी शेतात आले होते.

या पाहणीदरम्यान पंचनामा करण्यात आला; मात्र तो एकतर्फी व अर्धवट असल्याचा आरोप सदर शेतकऱ्यांनी केला आहे. याच वेळी हक्काबाबत चर्चा सुरू असताना, सबंधित शेतकऱ्याने आमच्यावर अन्याय झाला तर, आम्हाला आत्महत्या करावी लागेल ! असे उद्विग्न अवस्थेत म्हटले आहे. मात्र यावर नायब तहसीलदार कुळमेथे यांनी करा मग.. असे उत्तर दिल्याने या प्रकरणाला वेगळी कलाटणी मिळाली आहे.परिणामी या विषयात तालुक्यात उलटसुलट चर्चांना उधाण आले आहे. शेतकऱ्यांचा आरोप असा आहे की, पाहणीसाठी आलेल्या अधिकाऱ्यांनी रस्त्याची पाहणी करण्याऐवजी शेतकऱ्यांशी बोलताना उद्धट, आरडाओरड करणाऱ्या व अंगावर गेल्यासारख्या भाषेत संवाद साधला. 'आत्महत्या करा' असे शब्द वापरताना संबंधित अधिकारी पदाची गुर्मी असल्यासारखे, माजात बोलत होते. शेतकऱ्यांशी सन्मानाने वागण्याऐवजी दडपशाहीच्या सुरात संवाद साधल्याचा आरोप करण्यात आला आहे. या घटनेदरम्यान शेतकऱ्यांनी स्वतः चित्रीत केलेले व्हिडिओ तसेच स्पॉट पंचनामा करतानाचे दृश्य व्हॉट्सअॅप ग्रुपवर फिरत असून, त्यामुळे रिसोड तहसील प्रशासनाचा कारभार पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. मात्र, या प्रकरणी अद्याप अधिकृत प्रशासनाकडून कोणतीही प्रतिक्रिया देण्यात आलेली नाही. महत्त्वाचे म्हणजे, रिसोड तहसीलमध्ये नायब तहसीलदार शेतकरी व नागरिकांशी उद्धटपणे वागणुकीची ही एकमेव घटना नसून, यापूर्वीही अशा प्रकारच्या अनेक तक्रारी समोर आल्याचे बोलले जात आहे.

त्यामुळे तहसील प्रशासनाच्या एकूणच कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे.संबंधित प्रकरणांची निष्पक्ष चौकशी करून कारवाईची मागणी होत आहे.

## थोडक्यात

### संत बिरबलनाथ महाराज यात्रा महोत्सवानिमित्त रक्तदान शिबिर

**नाथसेवा फाउंडेशन स्तुत्य उपक्रम**



●सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर●

नाथ सेवा फाउंडेशन ही संत बिरबल नाथ महाराजांचे प्रचार व प्रसार करण्याचे कार्य करत असते. या संस्थेतर्फे 'ग्रामदैवत संत बिरबलनाथ महाराज' यांचे यात्रे निमित्त, नाथसेवा फाउंडेशन तर्फे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळेस ७५ रक्तदात्यांनी सहभाग नोंदविला तसेच महिला भक्तांनी सुद्धा रक्तदान केले. यावेळेस काही तरी नवीन म्हणून कागदी किंवा प्लास्टिक कप न वापरता मातीचे कुल्हड या कपा मध्ये रक्तदात्यांना चहा बिस्किट देण्यात आले. तसेच रक्तदात्यांना नाथ महाराजांची प्रतिमा भेट देण्यात आले. लेडी हार्डिंग अकोला येथील शासकीय रक्तपेढी यांच्यात फे रक्तदान शिबिराला रक्तदान करणाऱ्या रक्तदात्यांना सन्मानपत्र देण्यात आले.नाथसेवा फाऊंडेशनची विश्वस्त कार्यकारिणी तसेच किशोर खोडके, सुमित डावरे. यांचे विशेष सहकार्य लाभले.

### परळीकर बंधुंचा सत्कार



●सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर●

मंगरूळपीर तालुक्यातील त्रिनेत्री विद्यालय पेडगाव येथे नवनिर्वाचित नगराध्यक्ष अशोकभाऊ परळीकर व ज्येष्ठ बंधू चंदूभाऊ परळीकर यांचा व काही नगरसेवकांचा यावेळी सन्मानपूर्वक सत्कार करण्यात आला.यावेळी विद्यालयाचे मुख्याध्यापक शिक्षक वृंद कर्मचारी. यांनी हा योगायोग घडवून आणला यावेळी गावातील प्रतिष्ठित नागरिक सरपंच, उपसरपंच ग्रा.प.सदस्य व ग्रामस्थ उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन शिवचरण शिंदे सर यांनी केले.

## जागरूक नागरिकासोबत असे घडले, निर्जन वस्तीत नेऊन सोडले !

### * प्रश्न विचारल्याची मिळाली शिक्षा * मग सामान्य व्यक्तीची कोण करेल रक्षा

●सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर●

मंगरूळपीर येथील ज्येष्ठ नागरिक इरफान शेख यांनी आरटीओ अधिकारी धनवट यांना सुसाट वेगाच्या वाहनांवर आपण कारवाई का करत नाही असा प्रश्न विचारला असता आम्ही कशी कारवाई करतो हे तुम्हाला दाखवते म्हणून गाडीत बसवले.





व मंगरूळपीर कारंजा हायवेवर दूरवर गाडी नेऊन निर्जन ठिकाणी गाडी उभी केली तसेच इरफान शेख व त्यांचे सहकारी यांना गाडीतून उतरण्यास सांगितले. व मला पुढे काम आहे त्यामुळे तुम्ही इथेच उतरा असे सांगितले. सदर प्रकारामुळे माझ्या जीवितास धोका निर्माण होऊ शकला असता, अशा आशयाची गंभीर तक्रार शेख इरफान यांनी परिवहन मंत्र्यांकडे केली आहे. या संताप जनक प्रकारावर समाजातील सर्व स्तरावरून टीका होत आहे. तसेच परिवहन मंत्री यामध्ये कारवाई करतील का असा सवाल देखील उपस्थित होत आहे. प्रश्न विचारणाऱ्या नागरिकांना अवैधरीत्या ताब्यात घेऊन गाडीत बसायला सांगणे तसेच त्यांना निर्जन ठिकाणी धोकादायक महामार्गावर सोडून देणे हा प्रकार एखाद्याच्या जीवाशी खेळण्यासारखाच नाही का

**वाशिम आरटीओ विभागाचा**

**संताप जनक प्रकार**

असा सवाल सुद्धा शेख इरफान यांनी उपस्थित केला. त्यामुळे तक्रारीतून समोर आलेल्या वस्तुस्थितीमध्ये परिवहन विभागाची ही कार्यपद्धती मनमानी कारभाराचे प्रतिक दिसून येत आहे.या धक्कादायक बाब म्हणजे सदर नागरिक इरफान शेख यांनी ते स्वतः एका साप्ताहिकाचे शहर प्रतिनिधी असल्याचे सांगितले व प्रेस चे ओळखपत्र सुद्धा दाखवले. असे असताना सुद्धा त्या महिला आरटीओ अधिकारींनी सदर ओळखपत्र जप्त केले.

## शिवछत्रपती प्रेरणा पुरस्कार वितरण

●सिटी न्युज ब्युरो @ रिसोड●

विद्यार्थी हक्क कृती समिती महाराष्ट्र राज्य, वाशिम जिल्हा आयोजित. शिवछत्रपती प्रेरणा पुरस्कार व विद्यार्थी हक्क कृती समिती सर्व पदाधिकारी मेळावा रिसोड येते संपन्न झाला. कार्यक्रमाच्या प्रास्तविकेमधून अध्यक्ष सुमित मधुकर जमधाडे यांनी केले. या कार्यक्रमासाठी प्रमुख उपस्थिती विश्वनाथ सानप , दत्तरावजी धांडे , राम बाळासाहेब देशमुख , रोहित दांदडे , राहुल बोडखे तोसिफ शेख , व इतर सर्व मान्यवर उपस्थित होते .



यामध्ये पुढील मुख्य पुरस्कार देण्यात आले १)आदर्श कृषी शेतकरी-परमेश्वर हुंबाड २) युवा उद्योजक-विठ्ठल बोडखे (सूर्या चाय) ३) समाज सेवक-सदानंद गायकवाड ४) आरोग्य विभाग-छाया धांडे ५) आरोग्य विभाग-डॉ. निखिल साळवे ६) आदर्श सामाजिक संस्था -सुभेदार रामजी ट्रस्ट एकता नगर रिसोड (अध्यक्ष-अलंकार खैरे व सदस्य दामोदर धांडे, मेजर कळासरे, सुनिल गवई) ७) कला व साहित्य-डॉ. सिद्धार्थ इंगोले ८) आदर्श शिक्षक ग्रामीण-गजानन घोटे ९) आदर्श शिक्षक शहरी-डॉ. प्रकाश हनवते १०) सामाजिक कार्य-डॉ. विजय गायकवाड ११) क्रीडा-हनुमान कोरडे १२) समाज प्रबोधन-शालिकराव पठाडे १३) युवा प्रत्रकार-केशव गरकळ. त्याचबरोबर शिवछत्रपती युवा सन्मान, पुरस्कार प्रदान करण्यात आले. त्यामध्ये अनेक युवक उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु.गायत्री देशमुख यांनी केले आणि कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन सिद्धार्थ घुगे यांनी केले.

## हरभरा पिकाचे वन्यप्राण्याकडून नुकसान !

●सिटी न्युज ब्युरो @ रिसोड●

तालुक्यातील घोटा-चिखली वन्य प्राण्याचा मोठ्या प्रमाणात उपद्रव होत असल्यामुळे शेतातील हरभरा तूर भाजीपाला आधी पिकांचे वन्य प्राण्याकडून मोठ्या प्रमाणात नुकसान होत असल्यामुळे शेतकरी वर्ग मेटाकुटीला आल्याचे चित्र सध्या दिसून येत आहे.






शेती करणे आता सोपे राहिले नाही शेतीत उत्पादनात होणारी घट त्यात बाजारात गावात होणारी चढ, उतार मजूर टंचाई नैसर्गिक संकट नैसर्गिक आपत्ती याबरोबर जवळ नसलेली आर्थिक क्षमता अशा विविध कारणामुळे दिवसेंदिवस शेती व्यवसाय मोठ्या प्रमाणात अडचणीत सापडला आहे. विविध संकटावर मात करत शेतकरी मोठ्या प्रमाणात उत्पादन मिळून आपला व आपल्या कुटुंबाचा उद्या निर्वाह होईल या आशेवर शेती करीत असतो परंतु गत दहा बारा वर्षापासून शेतकऱ्यांच्या समोर एक नवीनच मोठे संकट उभे राहिले असून एकेकाळी शेतातल्या धुऱ्याला दुसऱ्याचे जनावरे चारण्याची भीती पशुपालकाला होत आहे. शेतातील पिकाचे नुकसान किंवा पाळीव जनावरांनी जर पीक खाल्ले तर शेतकरी आपल्याशिवाय दुसऱ्याला विचारणार नाही अशा प्रकारची भीती शेतातल्या धुऱ्यावर पाळीव जनावरे चालणाऱ्या भीती होती परंतु आता पाळीव जनावरे तर एकदम कमी झाली असून मोकाट वन्य प्राणी मोठ्या प्रमाणात वाढल्यामुळे पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत असून दिवसेंदिवस वन्य प्राण्याचा मोठ्या प्रमाणात वावर असल्यामुळे अनेक पिके नामशेष होण्याच्या मार्गावर दिसू लागली आहेत. अनेक शेतकरी वर्गांनी यावर्षी पाण्याची उपलब्धता मोठ्या प्रमाणात असल्यामुळे आपल्या शेतात हरभरा

**घोटा- चिखली परिसरातील शेतकरी मेटाकुटीला**

पिकांची मोठ्या प्रमाणात पेरणी केली हा हरभरा राखण्यासाठी रातभर जागरण करून शेतकरी थकला असता अचानक तास दोन तासातच वन्य प्राणी या शेतकऱ्यांच्या पिकावर डल्ला मारून पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान करत आहेत. शासनाने या शेतकऱ्यांच्या समस्या कडे गांभीर्यांनी लक्ष देऊन आर्थिक मदत व उपाय योजना करावी अशी मागणी शेतकरी वर्गांमधून जोर धरत आहे. अनेक वेळा या वन्यप्राण्याकडून शेतकऱ्यावर हल्ले झाल्यामुळे कित्येक शेतकरी जखमी झाल्याचे सुद्धा प्रकार घडले आहेत..




## दारूचे दुकान हटवण्यासाठी...

# नारी शक्तीचा एल्गार!

### दुकानासमोरच मांडला ठिय्या

●सिटी न्युज ब्युरो @ रिसोड●

शहरातील इंदिरानगर परिसरात सुरू असलेल्या देशी दारूच्या दुकानामुळे महिलांना, शाळेतील विद्यार्थी व नागरिकांना होणारा त्रास लक्षात घेऊन परिसरातील महिलांनी सदर दुकान हटविण्याच्या मागणीसाठी दारू दुकानसमोरच ठिय्या आंदोलन केले. या दारू दुकानामुळे परिसरातील सामाजिक स्वास्थ बिघडत असून महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होत असल्याची तक्रार नागरिकांनी केली आहे. या संदर्भात सबंधित प्रशासनाकडे निवेदन देऊनही ठोस कारवाई न केल्यामुळे अखेर महिलांनी रस्त्यावर उतरून ठिय्या आंदोलन करण्याचा मार्ग निवडला.





रिसोड शहरातील इंदिरानगर परिसरात सुरू असलेल्या देशी दारूच्या दुकानामुळे महिलांना व शाळेतील विध्यार्थी व नागरिकांना होणाऱ्या त्रासाच्या पार्श्वभूमीवर दि.९ फेब्रुवारी रोजी सकाळी परिसरातील महिलांनी थेट दुकानासमोरच ठिया आंदोलन केले.

या दारू दुकानामुळे परिसरात सतत गोंधळ, भांडणे, असभ्य वर्तन तसेच महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होत असल्याची तक्रार नागरिकांनी केली आहे. अनेक वेळा संबंधित प्रशासनाकडे निवेदन देऊनही कोणतीही ठोस कारवाई न झाल्याने अखेर महिलांनी रस्त्यावर उतरुन आंदोलनाचा मार्ग स्वीकारला. आंदोलनादरम्यान महिलांनी दारू दुकान हटवा, आमच्या परिसरात शांतता हवी अशा घोषणा देत आपला रोष व्यक्त केला. या दुकानामुळे किशोर वयन मुलांवरही वाईट परिणाम होत असूनसामाजिक वातावरण बिघडत असल्याचे मत महिला आंदोलकांनी मांडले. या वेळी काही सामाजिक कार्यकर्ते व स्थानिक नागरिकांनीही आंदोलनाला पाठिंबा दिला. आंदोलनाची माहिती मिळताच

रिसोड पोलीस स्टेनचे कर्तव्य दक्ष ठाणेदार रामेश्वर चव्हाण, कार्यतत्पर तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर, मुख्याधिकारी सतिश शेवदा, नगराध्यक्ष भागवानदादा क्षिरसागर, नवनिर्वाचित आरोग्य शिक्षण सभापती संतोष चऱ्हाटे, नगरसेविका सौ माधुरी इरतकर, पोलीस, महसूल उत्पादन शुल्क विभागाच्या अधिकाऱ्यांनी घटनास्थळी भेट देऊन आंदोलक महिलांशी चर्चा केली. प्रशासनाने लवकरात लवकर या प्रकरणावर निर्णय घेऊ जो प्रयन्त निर्णय घेणार नाहीत तो प्रयत्न दारू दुकानबंद ठेवा आसा हाट्ट अदोलकानी लावुन धरल्याने. बद ठेवा मग किती दिवस लागु निर्णय घेण्यासाठी जो प्रयन्त दुकान हाटणार तो प्रयन्त स्वस्त बसणार नाही. मागणी मान्य करावी, अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा दिला.

### अवैध गौण खनिज उत्खनन प्रकरणी

## महसूल विभागाची कारवाई

●सिटी न्युज ब्युरो @ कारंजा●

कारंजा तालुक्यामध्ये अवैद्य गौण खनिज उत्खनन करणारी माफिया टीम सक्रिय झालेली आहे.बरेच माफिया बाहेरून येऊन तालुक्यांमध्ये मोठ्या प्रमाणे अवैद्य उत्खनन करत आहे. याबाबत तक्रारी सुद्धा झालेली आहे.धंतालुक्यातील बऱ्याच ठिकाणचे अवैद्य उत्खननाचे प्रकार वृत्तपत्रातील बातमीच्या माध्यमातून उघडकिस येत आहे, तेव्हा तहसीलदार पासून ते तलाठी पर्यंत महसूल विभाग काय करतो, यांच्या मर्जीने हा सर्व ?प्रकार सुरू आहे काय असा प्रश्न सर्वसामान्य च्या मनात उपस्थित होत आहे.



**बाहेरच्या माफीयांचे तालुक्यात सर्रास अवैद्य उत्खनन सुरू**

या अवैध्य उत्खननाबाबत काही वृत्तपत्रांमध्ये बातम्या प्रकाशित झाल्या त्यामुळे महसूल विभागाला जाग आली व त्यांनी कामरगाव टाकळी शिवारात होत असलेल्या अवैद्य गौण खनिज उत्खननावर मोठी कारवाई केली, या कारवाईमध्ये एक जेसीपी व दोन ट्रॅक्टर जप्त करण्यात आले.उत्खननाच्या मोक्यावरून दोन ट्रॅक्टर फरार झाल्याची माहिती मिळाली आहे.ही कारवाई कामरगाव मंडळाधिकारी जी.जी.पवार, टाकळी खुर्द चे ग्राम महसूल अधिकारी अमोल वक्ते, टाकळी बुद्रुकचे ग्राम महसूल अधिकारी बालाजी माघाडे, तसेच पो. हे.कॉन्स्टेबल खोलेश्वर खूपसे व पोलीस कॉन्स्टेबल युसूफ कालीवाले पोलीस स्टेशन धनज बु.या पथकाने कारंजा तहसीलदार रवी महाले यांच्या मार्गदर्शनात केली.

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड
बुधवार, दि. ११ फेब्रुवारी २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

# स्वीकृत नगर सेवकांबाबत मंत्री चंद्रकांत पाटलांचे भाकीत होणार काय खरे?

## पक्षासाठी कष्ट घेणाऱ्या कार्यकर्त्यांना मिळेल का न्याय?

प्रतिनिधी ११ फेब्रुवारी

**अकोला:** महापालिकेच्या महापौर व उपमहापौरांची नियुक्ती झाल्यानंतर, आता सर्वांनाच वेध लागले आहेत ते म्हणजे स्वीकृत नगरसेवकांच्या निवडणुकीचे. कारण निवडणुकी आधी बंडखोरांना शांत करण्यासाठी स्वीकृत नगरसेवक पदाचे चॉकलेट देण्यात आले होते. यात इच्छुकांची संख्या मोठी आहे. परंतु भाजपाला स्पष्ट बहुमत न मिळाल्याने भाजपा किती नाराज कार्यकर्त्यांना स्वीकृत नगरसेवक बनवून संतुष्ट करणार की, परत आपल्याच मर्जीतील कार्यकर्त्यांचे पुनर्वसन केले जाईल याकडे सर्वांचेच लक्ष लागले आहे. संख्या बळाचा विचार करता भाजपा प्रणित शहर सुधार आघाडीचे चार नगरसेवक निवडून येतील. १६ फेब्रुवारी नंतर होणाऱ्या महापालिकेच्या दुसऱ्या सर्वसाधारण सभेत स्वीकृत नगरसेवकांच्या नावांची अधिकृत घोषणा केली जाईल. शहर सुधार आघाडी सोबतच विरोधकांमध्ये सुद्धा स्वीकृत नगरसेवक निवडीबाबत एकमत नसल्याचे दिसून येत आहे. संख्याबळानुसार काँग्रेस ला दोन तर उद्धवसेना आणि वंचित बहुजन आघाडीला प्रत्येकी एक स्वीकृत नगरसेवक पद मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. ज्याप्रमाणे सत्ताधाऱ्यांसमोर स्वीकृत नगरसेवक पदी कोणाची नियुक्ती करावी हा मोठा प्रश्न उभा ठाकला आहे. तशीच परिस्थिती विरोधकांची झाली आहे. वास्तविक पाहता स्वीकृत नगरसेवक पदी समाजकार्य, शिक्षण, आरोग्य, कायदा आदी क्षेत्रातील तज्ञांचा अनुभव शहराच्या नियोजनबद्ध विकासासाठी व्हावा, या उद्देशाने स्वीकृत नगरसेवकांची तरतूद करण्यात आली आहे. मात्र अकोला महानगरपालिकेत ही पदे तज्ञांसाठी नव्हे तर सत्ताधारी व विरोधकांकडून राजकीय पुनर्वसनाचे साधन म्हणूनच वापरली जाणार का? असा सवाल आता उपस्थित होत आहे. कारण राजकारण हा जणू नवा पेक्षा बनत चालल्याने शिक्षण, आरोग्य, कायदा, नगर रचना अशा क्षेत्रातील तज्ञांना दुय्यम स्थान दिले जात असल्याची टीका होत आहे. शहराच्या विकासासाठी अभ्यास करणाऱ्या व्यक्ती बाजूला ठेवून आपलाच माणूस या निकषावर स्वीकृत नगरसेवक ठरवले जाणार असतील, तर या पदाचा मूळ हितच संपुष्टात येईल अशी ओरड होत आहे. परंतु काल शहरात आलेले राज्याचे कॅबिनेट मंत्री आणि माजी प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांनी पक्षाची शिस्त पाळणाऱ्या आणि पक्षासाठी कष्ट उपसणाऱ्या कार्यकर्त्यांची नियुक्ती स्वीकृत नगरसेवक पदी केली जाईल. असे आश्वासन दिले आहे. परंतु मंत्री महोदय निघून गेल्यानंतर महापालिकेचा कारभार हाकणाऱ्या दोन्ही भाऊंच्या मर्जीतील कार्यकर्त्यांची वर्णी स्वीकृत नगरसेवक पदी लागण्याची शक्यता दिसून येत आहे. त्यामुळे मंत्री महोदयांच्या आश्वासनाला काहीही महत्त्व नसल्याचे भाजपा कार्यकर्ते खासगीत बोलत आहेत. महापालिका निवडणुकीचे तिकीट न मिळालेल्या अनेक भाजपा कार्यकर्त्यांना स्वीकृत नगरसेवक पदाचे चॉकलेट देऊन त्यांना शांत बसविण्यात आले होते. परंतु आता जर त्यांना स्वीकृत नगरसेवक पदाची लॉटरी लागली नाही, तर पक्षांतर्गत बंडखोरी आणखी उफाळून येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# बिंदी घर परिसरात आता होणार प्रशस्त रस्ता

## रस्ता रुंदीकरणामुळे नागरिकांची गैरसोय होणार दूर



प्रतिनिधी ११ फेब्रुवारी

**अकोला:** येथील सिटी कोतवाली परिसरातील 'बिंदी घर' दुकानाचे अतिक्रमण हटवल्यानंतर, त्या जागेवर पुन्हा अतिक्रमण होऊ नये या उद्देशाने महानगरपालिका प्रशासनाकडून रस्ता रुंदीकरणाचे काम हाती घेण्यात आले आहे. मनपाच्या या निर्णयाचे स्वागत होत आहे.

'बिंदी घर' दुकानात खरेदीसाठी येणाऱ्या एका विवाहित महिलेचा विश्वास संपादन करून, तिचे अश्लील व्हिडिओ बनवून लैंगिक शोषण केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला होता. या घटनेमुळे संपूर्ण जिल्ह्यात मोठी खळबळ उडाली होती. याप्रकरणी पोलिसांनी दुकान मालकासह अन्य चार आरोपींना अटक केली आहे. या घटनेनंतर 'बिंदी घर' दुकानाचे अतिक्रमण हटवण्याची मागणी जोर धरू लागली होती.

जनभावनेची दखल घेत महानगरपालिका प्रशासनाने तातडीने कारवाई करत बिंदी घरचे अतिक्रमण जमीनदोस्त केले. या मोकळ्या जागेवर भविष्यात पुन्हा अतिक्रमण होऊ नये, यासाठी प्रशासनाने तातडीने रस्ता बांधकामाचे काम सुरू केले आहे. पूर्वी या अतिक्रमणामुळे हा रस्ता अत्यंत अरुंद झाला होता, ज्यामुळे वाहतुकीला अडथळा येत असे. मात्र, आता रस्ता रुंद होत असल्याने सिटी कोतवालीच्या मागील भागात जाणाऱ्या नागरिकांसाठी दळणवळण सोयीचे होणार आहे. महानगरपालिकेच्या या सकारात्मक पुढाकाराबद्दल शहरवासीयांकडून समाधान व्यक्त केले जात आहे.

# वडिलांचा अपघाती मृत्यू; पुतण्या गंभीर

प्रतिनिधी ११ फेब्रुवारी

**अकोट :** मुलीच्या लग्नाच्या पत्रिका वाटण्यासाठी आलेल्या वडिलांचा ट्रकच्या धडकेत जागीच मृत्यू झाला तर त्यांचा पुतण्या गंभीर जखमी झाला. ही घटना मंगळवारी दुपारी १ वाजता पोपटखेड मार्गावरील चौकाजवळ घडली.


मधुकर डोमाजी मेसकर (५८, रा. ब्राह्मणवाडा, जि. अमरावती) पुतण्या नेहल मेसकर (२२) यांच्यासह दुचाकीवरून जात असताना भरधाव ट्रक टिप्परने पाठीमागून धडक दिली. मधुकर मेसकर यांना ग्रामीण रुग्णालयात मृत घोषित करण्यात आले. नेहल मेसकर यांच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. अपघातानंतर ट्रक चालक फरार झाला असून पोलिस तपास करत आहेत.

# ज्ञानगंगा अभयारण्यात सफारी दरम्यान पर्यटकांना झाले वाघाचे दर्शन

## पीकेटी ७ सीपी १ वाघाचा ज्ञानगंगा अभयारण्यात अधिवास

प्रतिनिधी ११ फेब्रुवारी

**अकोला:** वन्यजीव विभागा अंतर्गत येत असलेले ज्ञानगंगा अभयारण्य हे वन्यप्राण्यांसाठी नवं पर्वणी ठरत आहे. ज्ञानगंगा अभयारण्यात पूर्वी अस्वल, बिबट तसेच इतर प्राण्यांचे दर्शन पर्यटकांना व्हायचे, परंतु राज्य शासन तसेच वन्यजीव विभागाच्या पुढाकाराने मागील महिन्यात नागपूर येथील पेंच व्याघ्र प्रकल्पामधून पीकेटी७ सीपी १ हा वाघ ज्ञानगंगा अभयारण्याच्या निसर्ग अधिवासात सोडण्यात आला. त्यामुळे अभयारण्याची समृद्धी वाढली आहे



गेल्या काही दिवसांपासून या वाघाने ज्ञानगंगा अभयारण्यात आपले वर्चस्व कायम केले असून सद्यस्थितीत ज्ञानगंगा अभयारण्यात येणाऱ्या पर्यटकांना या वाघाचे दर्शन मोठ्या प्रमाणात होत आहे. ज्ञानगंगा अभयारण्यात नव्याने आलेला धुरंदर वाघ हा सगळ्यांचे आकर्षणाचे केंद्रबिंदू ठरत आहे. इतकेच नव्हे तर पर्यटकांची संख्या देखील वाढली आहे.

# शाळकरी मुलीवर अत्याचार

## पोक्सो व ॲट्रॉसिटी अंतर्गत गुन्हा

प्रतिनिधी ११ फेब्रुवारी

**अमरावती:** परिसरात एक अत्यंत धक्कादायक घटना समोर आली असून बदनामी करण्याची धमकी देत एका शाळकरी अल्पवयीन मुलीवर अत्याचार केल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे.

या प्रकरणी पोलिसांनी आरोपीविरोधात पोक्सो (POCSO) कायदा तसेच ॲट्रॉसिटी कायद्यानुसार गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे. सध्या पीडित मुलगी सुमारे तीन महिन्यांची गर्भवती असल्याची माहिती समोर आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, आरोपीने मुलीला तिची बदनामी करण्याची धमकी देत वारंवार मानसिक दबाव टाकला. या भीतीमुळे मुलगी काही काळ गप्प राहिली. मात्र प्रकृतीत बदल जाणवू लागल्यानंतर कुटुंबीयांना संशय आला आणि संपूर्ण प्रकार उघड झाला. त्यानंतर कुटुंबीयांनी तात्काळ पोलिसांत धाव घेत तक्रार नोंदवली.

पोलिसांनी घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन तत्काळ गुन्हा दाखल केला आहे.

# बसस्थानक चौकात सिग्नलचा लपंडाव

## सिग्नल संदर्भात दिरंगाई अपघाताला निमंत्रण देणारी

प्रतिनिधी ११ फेब्रुवारी

**अकोला:** लक्झरी बसस्थानक चौकात सिग्नल बसवण्यात आले. हे सोयीचे झाले. परंतु या चौकातील सिग्नल अधूनमधून बंद राहतात. ही अडचण एखाद्या वेळी अपघाताला कारणीभूत ठरू शकते. त्यामुळे हा चौकच नाही तर शहराच्या अन्य भागातील सिग्नल व्यवस्थित राहावे याकडे लक्ष देणे आवश्यक आहे



अशातच वाशीम बायपास चौकातील सिग्नल व्यवस्था कोलमडली होती. त्याची तात्पुरती दुरूस्ती करण्यात आली. आणि काल रात्री लक्झरी बसस्थानक चौकात सिग्नलचा लपंडाव दिसला. रात्री बेरात्री या मार्गाने जाणाऱ्या नागरिकांची त्यामुळे तारांबळ उडाली. वाहने सुसाट धावतात त्यावेळी सिग्नलचा आधार असतो त्यामुळे संबंधित यंत्रणेने या समस्येकडे वेळीच लक्ष देणे आवश्यक आहे.

# अमेरिकेच्या निर्यात शुल्क कपातीचे विदर्भ चेंबरकडून स्वागत

प्रतिनिधी ११ फेब्रुवारी

**अकोला.** अमेरिकेने भारतीय निर्यातीवरील शुल्कात कपात करत ते १८ टक्क्यांपर्यंत कमी केले आहे. या निर्णयामुळे भारतीय उत्पादकांना अमेरिकेत आपले साहित्य व उत्पादने निर्यात करणे अधिक सुलभ होणार असून त्यांच्यावरचा आर्थिक भारही कमी होणार आहे. अमेरिकेच्या या निर्णयाचे विदर्भ चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीने स्वागत केले आहे.

विदर्भ चेंबरचे अध्यक्ष निकेश गुप्ता यांनी या निर्णयाचे स्वागत करत सांगितले की, अमेरिकेच्या या लवचिक धोरणामुळे भारतीय



उत्पादनांवरील शुल्क घटणार असून निर्यातीला मोठा वाव मिळणार आहे. गुप्ता यांनी नमूद केले की, या शुल्क कपातीचा लाभ वस्त्र उद्योग, रसायन उद्योग, परिधान, रत्न-आभूषण तसेच सागरी उत्पादन क्षेत्राला विशेषतः मिळणार आहे. ते पुढे म्हणाले की, अमेरिकेचा हा निर्णय केवळ निर्यात वाढीपुरता मर्यादित नसून तो रोजगार निर्मिती, नव-निर्मिती (Innovation) आणि उत्पादन विविधीकरणाला प्रोत्साहन देणारा ठरेल. तसेच यामुळे भारत आणि अमेरिका यांच्यातील मैत्री अधिक दृढ होऊन दोन्ही देशांच्या सांस्कृतिक व आर्थिक संबंधांवर सकारात्मक परिणाम होईल.

या पार्श्वभूमीवर, उद्योजकांनी या निर्यात शुल्क कपातीचा लाभ घेऊन आपली उत्पादने जागतिक बाजारपेठेत अधिक प्रभावीपणे पोहोचवावी, असे आवाहनही त्यांनी केले.

# जिल्ह्यातील नदी पात्रातील वाळू घाट लिलाव प्रक्रिया खोळंबली

## घरकुल योजनेच्या लाभार्थ्यांना बसतोय फटका

प्रतिनिधी ११ फेब्रुवारी

**अकोला:** जिल्ह्यातील नदीपात्रांमधील वाळू घाटांची लिलाव प्रक्रिया अनेक दिवसांपासून खोळंबली असून याचा फटका घरकूल योजनेतील लाभार्थ्यांना बसत आहे. स्वस्त दरात वाळू मिळत नसल्याने जिल्ह्यातील घरकुलांचे बांधकाम थांबाले आहे. जिल्ह्यातील एकूण ३८ वाळू घाटांपैकी फक्त १७ घाटांचा लिलाव अधिकृतपणे पूर्ण झाला असला, तरी २१ घाट

लिलाव अद्याप बाकी आहे.

प्रशासनाकडून वारंवार मुदतवाढ देऊन सुद्धा प्रतिसाद मिळत नसल्याचे दिसून येत आहे. प्रशासनाने यापूर्वी २४ वाळूघाटांच्या ई-लिलाव प्रक्रियेला मुदतवाढ दिली होती. त्यात अकोला व बाळापूर तालुक्यांतील १० घाटांना चौथी, तर मूर्तिजापूर, बाळापूर व तेल्हारा तालुक्यांतील १४ घाटांना पहिल्यांदा मुदतवाढ देण्यात आली होती. परंतु अद्याप लिलाव न झालेल्या घाटांवर वाळू तस्करांची नजर पडली असून या घाटांमधून वाळू चोरी जाण्यास सुरुवात झाली आहे. या मध्ये अकोला तालुक्यातील कपिलेश्वर, एकलारा, म्हैसांग, उगवा, बाळापूर तालुक्यातील बहादुरा, सागद, नागद, मांजरी तसेच इतर काही घाटांचा समावेश असून या घाटांना पुन्हा मुदतवाढ देण्यात आली आहे.

# सिंधी कॅम्प पक्की खोली भागात कचऱ्याचे ढिगार

## महापालिका प्रशासन नगरसेवकांचे दुर्लक्ष

प्रतिनिधी ११ फेब्रुवारी

**अकोला:** सिंधी कँप पक्की खोली भागातील जेतवन नगर रोडवर कचऱ्याचे ढिगार दिसतात. नगरसेवक आणि महानगरपालिकेचे दुर्लक्ष दिसते. महानगरपालिकेने कितीही कचऱ्याचे नियोजन केले तरी सिंधी कॅम्प पक्की खोली भागात नियोजन फक्त कागदावर दिसते. नागरिकांची गैरसोय लक्षात घेऊन मार्ग काढावा अशी मागणी केली जात आहे.

सिंधी कॅम्प पक्की खोली येथील प्रभाग क्रमांक १६ आणि प्रभाग क्रमांक १९ मधील नागरिक कचऱ्याच्या समस्येमुळे त्रासले आहेत. कचरा उचलणारी गाडी प्रभाग १९ मध्ये येत नाही. त्यामुळे सर्व घरातील कचरा प्रभाग क्रमांक १६ च्या रस्त्यावर आणून



टाकतात. त्यामुळे रस्त्याला कचरा कुंडाचे स्वरूप आले आहे. महानगरपालिकेने जी प्रभाग रचना केली त्यामध्ये सिंधी कॅम्प पक्की खोली मधील पाटील दूध डेअरी पासुन काही भाग हा प्रभाग १९ मध्ये येतो. त्यामध्ये छोट्या छोट्या गल्ल्या आहेत. तसेच प्रभाग १९ मधील खदान परिसरातील लोक तिथे मेलेले कुत्रे आणूण टाकतात. त्यामुळे आजूबाजूला राहत असलेल्या घरांना दुर्गंधीचा सामना कराव लागतो. त्यांच्या आरोग्यावर परिणाम होत आहे. महानगर प्रशासन याकडे लक्ष देईल का..? अशी विचारणा येथील नागरिक करत आहेत. महानगरपालिका प्रशासनाने याकडे लक्ष द्यावे नाहीतर सर्व नागरिक उपोषण करतील असा इशारा दिला आहे.

# शनिवारपासून सार्वजनिक शिवजयंती उत्सवाला प्रारंभ

प्रतिनिधी ११ फेब्रुवारी

**अकोला:** महानगरातील सार्वजनिक शिवजयंती उत्सव समितीच्या वतीने १४ ते १९ फेब्रुवारी पर्यंत शिवजयंती निमित्त शिव सप्ताह विविध कार्यक्रमाच्या अनुषंगाने आयोजित करण्यात आला आहे.

यंदा या शिवजयंती सोहळ्याचे मुख्य आकर्षण 'स्वराज्याचा रक्षक-शिव छावा नाटिका' राहणार असून विविध कार्यक्रमाच्या अनुषंगाने ही शिवजयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात येणार असल्याची माहिती सार्वजनिक शिवजयंती उत्सव समितीच्या वतीने आयोजित पत्रकार परिषदेत समितीचे पवन महल्ले यांनी दिली. यावेळी संजय गोटफोडे, निरंजन पावसाळे, राम बोंद्रे, अँड देवशिष काकड, संदीप बाथो आदी उपस्थित होते. शनिवार दिनांक १४ फेब्रुवारी रोजी सकाळी ९ वाजता छत्रपती शिवाजी पार्क येथील शिवप्रतिमेचे पूजन करून या शिव जयंती सप्ताहास प्रारंभ होणार आहे.

रविवार दिनांक १५ रोजी सकाळी १० वाजता शिवाजी पार्क येथे विद्यार्थ्यांसाठी चित्रकला स्पर्धा होणार आहे. तसेच सकाळी ११ वाजता याच ठिकाणी किल्ले बांधणी स्पर्धा होणार आहे. तर दुपारी १२ वाजता शिवकालीन शस्त्र प्रदर्शनीचा मान्यवरांच्या हस्ते प्रारंभ होणार आहे. सोमवार दिनांक १६ फेब्रुवारी रोजी प्रत्येक शाळेत शालेय स्तरावर निबंध स्पर्धा घेण्यात येणार आहे. शिव



छत्रपती च्या जिवनावर आधारित या शालेय निबंध स्पर्धेत सर्व विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले.

मंगळवार दिनांक १७ फेब्रुवारी रोजी सकाळी ८ वाजता टिळक पार्क परिसरात समितीच्या वतीने भव्य स्वच्छता मोहीम राबविण्यात येणार आहे. बुधवार दिनांक १८ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता शिवाजी पार्क परिसरात भव्य रांगोळी स्पर्धा होणार आहे. तर सायंकाळी ६ वाजता सिटी कोतवाली येथील महाराणा प्रताप बागेपासून ते शिवाजी पार्क पर्यंत भव्य मशाल रॅली आयोजित करण्यात आली आहे. गुरुवार दिनांक १९ फेब्रुवारी या शिवजयंती दिनी शिवाजी पार्क येथे सकाळी ६ वाजता छत्रपती शिवाजी महाराज यांचा जन्मोत्सव सोहळा जल्लोषात साजरा करण्यात येणार आहे. या नंतर शिवजयंती घरोघरी हे स्पर्धात्मक अभियान राबविण्यात येणार आहे. दु १ वाजता शिवाजी पार्क येथे अन्नदान सेवा उपक्रम होऊन दु ३ वाजता डॉ आंबेडकर खुले नाट्य गृह येथून शिवाजी महाराज पार्क पर्यंत भव्य महारैली आयोजित करण्यात आली आहे. ही महारैलीचे येथे आगमन झाल्यावर सायंकाळी ७ वाजता शिवाजी महाराज पार्क येथे छत्रपती संभाजी महाराज यांच्या वर आधारित 'स्वराज्याचा रक्षक-शिव छावा नाटिका' सादर करण्यात येणार आहे. या उत्सवात प्रमुख पाहुणे म्हणून पालकमंत्री आकाश फुंडकर, आ. रणधीर भाऊ सावरकर, खा अनुप धोत्रे, आमदार वसंत खंडेलवाल माजी महापौर विजय अग्रवाल भाजप जिल्हाध्यक्ष संतोष शिवरकर महानगराध्यक्ष जयंत मसने महापौर शारदाताई खेडकर उपमहापौर अमोल गोगे आदी उपस्थित राहणार असून शिवप्रेमी महिला, पुरुष, युवक युवतींनी या शिवजयंती सप्ताहातील उपक्रमात उत्स्फूर्तपणे सहभागी होऊन शिवजयंती महोत्सव साजरा करण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले. या पत्रकार परिषदेत यावेळी सार्वजनिक शिवजयंती उत्सव समितीचे राहुल लोहिया, सागर तिवारी, ऋषी जगताप, गणेश माने, ललित भंगाळे, गजु पाटील, अविनाश कानगुडे, हरीश जंगम, सनी मानकर, वैभव मोरे, अक्षय थोरात, शुभम गोतमारे, बाबू ठाकूर, पंकज मुराई, दुर्गेश पाटील, सूरज जगताप, प्रतीक खराटे, साहिल सप्रे, रोशन कसाब समवेत अनेक सेवाधारी व शिवप्रेमी उपस्थित होते.

# ऑटोरिक्षा चालकांना शिस्त लावणे गरजेचे

## कोठेही थांबून प्रवासी घेतात नियमांचे सर्रास उल्लंघन



प्रतिनिधी ११ फेब्रुवारी

**अकोला:** शहर विस्तारासोबत ऑटोरिक्षांची संख्या वाढली. परंतु काही ऑटोचालक नियमांचा भंग करताना दिसतात. वाहन कोठेही थांबून प्रवासी घेतात. ड्रेस कोड कुठेही दिसत नाही. आणि मुख्य म्हणजे नवशिक्या चालकांना तर नियम काय आहेत हे शिकवण्याची गरज आहे.

महापालिकेची सिटी बस सेवा बंद असल्याने नागरिकांना ऑटोरिक्षावर अवलंबून राहावे लागते. परंतु काही चालक नियम धाब्यावर बसवताना दिसतात. सिग्नल तोडून जाण्याची भीती वाटत नाही. तसेच काहींनी कर्णकर्कश हॉर्न लावले आहेत.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ **मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख** ▪ **संपर्क –** 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/2012/49642, RRC Helpline No. 8484842135

CMYK CMYK